# रंगपंचमी

MR
891.463
B 221 R

MR
891.463
B221R

मनोहर बंदे

NDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

For Marathi Section.

Presented to the IIAS. library where I have always got immense cooperation and have found a treasure house.

Usha Bande

23.7.03.

उषा बांदे

अध्येता.

DR. USHA BANDE,
Fellow, IIAS.

# रंगपंचमी

मनोहर बंदे

सूर्याक्षरविविधा
११९४, सदाशिव पेठ, पेरुगेट रस्ता, कॅनरा बँकेशेजारी
पुणे ४११ ०३०

सूर्याक्षरविविधा

प्रकाशन क्र. ४३ / नोव्हेंबर १९९९

रंगपंचमी (लघुकथा संग्रह)

**प्रकाशिका / मुद्रक :**

सौ. प्राची प्रदीप चिकटे
सूर्याक्षरविविधा
११९४, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४७८०५५ / ५६५३३६१

Indian Institute of ... Study
ACC NO G-5049
D. 24/7/003
SHIMLA

Library IIAS, Shimla
MR 891.463 B 221 R
G 5049

© डॉ. (कु.) उषा मनोहर बंदे

**आवृत्ती पहिली :** शके १९२१ / सन १९९९

**अक्षरजुळणी :**

सूर्याक्षरविविधा कॉम्प्युटर सर्व्हिसेस, पुणे.

**मुद्रण-स्थळ :**

साथीदार प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ :** सचिन जोशी


**मूल्य :** रु. ६० /-

MR
891.463
B 221 R

माझे मामा-मामी
श्री. रघुनाथ केशव पागे
आणि
सौ. शांताबाई पागे
यांना सादर समर्पित

- मनोहर बंदे

# - लेखक परिचय -



मनोहर बंदे

(२३-९-१९१५ - २३-८-१९९८)

दैनिक जीवनातील काही खट्याळ, काही प्रेमळ, काही विव्हळ करणारे अनुभव अचूक टिपणारे मनोहर बंदे व्यवसायाने जरी नाही तरी मनाने लेखक होते. मूळ राहणार अकोला (विदर्भ), पण सैन्यात भरती झाले, द्वितीय महायुद्ध पाहिले, जगभर हिंडले आणि सैन्यांतून सेवानिवृत्त होऊन शिमला येथे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर (CEO), जिल्हा परिषद म्हणून नियुक्त झाले. तेथून १९७४-७५ मध्ये निवृत्त झाले. वास्तव्य : Wexlow, Lower Kaithu, Shimla येथे होते. दि. २३-८-९८ रोजी देवाज्ञा झाली.

या संग्रहातील अधिकांश लघुकथा सैनिक समाचार (मराठी) मध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत.

# - मनोगत -

'रंगपंचमी' हा लघुकथा संग्रह वाचकांच्या हातात देताना मिश्रित भावना उचंबळून येत आहेत. एकीकडे आनन्द, की आपण वडिलांची इच्छा पूर्ण करू शकलो, तर दुसरीकडे हळहळ : 'अरे , हेच काम एक वर्ष अगोदर झाले असते, सम्पूर्ण झाले असते तर वडिलांनी आपले पुस्तक या सुंदर स्वरूपात पाहिले असते.' पण ''बलीयसी केवलम् ईश्वरीच्छा.''

ह्या गोष्टी साहित्यिक दृष्ट्या कितपत खऱ्या उतरतील हे मराठी साहित्यिक व आलोचक सांगू शकतील. परन्तु जीवनाचे लहान-लहान अनुभव शब्दबद्ध करणाऱ्या या लघुकथा जीवनाच्या पातळीवर नक्कीच खऱ्या ठरतील. वडिलांचे मराठी भाषेवर अत्यंत प्रेम. त्यांनी भाषा जोपासली व आम्हांला पण शिकविली. १९४७ नंतर आम्ही सर्व आई-वडिलांबरोबर उत्तर भारतातच राहिलों, तरी मराठी टिकवू शकलो ह्याचे श्रेय त्यांनाच.

आम्ही कधी महाराष्ट्राबाहेरील पर-प्रांतियांचे मत सांगितले की ''लोक म्हणतात मराठी गोड नाही,'' तर ते लगेच ज्ञानेश्वरीतील ओवी म्हणायचे, ''अरे, ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की ही भाषा 'अमृताते हि पैजा जिंके,' तुम्हाला आणखी काय 'प्रूफ' हवं ?'' आणि एक सांगायचं म्हणजे, मराठीवर प्रेम करणं शिकविणारे व प्रोत्साहित करणारे होते त्यांचे मामा-मामी, ज्यांना त्यांनी हा संग्रह समर्पित केला आहे.

संग्रह वाचकांच्या हाती आहे. आता त्यांनीच ठरवायचं की या कथा कशा आहेत. मला मात्र या अत्यंत प्रिय आहेत कारण या कथांमध्ये वावरणारी एक लहानशी पोर माझ्या परिचयाची आहे.

**उषा मनोहर बंदे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | रंगपंचमी | ७ |
| २. | शामलूभाई | १२ |
| ३. | दैवयोग | १८ |
| ४. | हिरवा चाफा | २४ |
| ५. | मेरी बारी | २९ |
| ६. | चोराच्या मनात चांदणं | ३५ |
| ७. | प्रतारणा | ४० |
| ८. | लेखक | ४४ |
| ९. | पातिव्रत्य | ४९ |
| १०. | त्या दोन रात्री | ५४ |
| ११. | फुई | ५८ |
| १२. | कुमार के पापा | ६२ |
| १३. | नाताळची भेट | ६६ |
| १४. | संशयकल्लोळ | ७१ |
| १५. | अनंत ऊर्फ अनंत | ७६ |

# रंगपंचमी

ते माझ्या डब्यात शिरत असताना मी जरा घोटाळलो. पांढरी शुभ्र इस्त्रीची पॅन्ट, त्यात खोचलेला पांढरा शर्ट, पांढराच कोट व डोईवरील पांढरे केस. अशा त्यांच्या अवतारात ते मला 'बेअरर' सारखे भासले. याला एक 'ट्रे' चहा आणायला सांगावे, असे विचार मनात येतात न येतात तोच त्यांची पूर्णाकृती दिसली व मला क्षणभर लाजल्यागत झालं. त्यांच्या चेहऱ्यावर एखाद्या तपस्व्याला लाजवेल असं तेज होतं.

हिवाळा सुरू होण्याच्या सुमारास शिमल्याला जाणाऱ्यांची गर्दी कमीच असल्यामुळे त्या दिवशी 'फर्स्ट क्लासच्या' डब्यात आम्ही दोघंच प्रवासी होतो. 'कालका-शिमला' आगगाडीचा प्रवास पुष्कळांना 'बोअर' होतो. मला असं कधीच झालं नाही. माझ्या विनोदी, खट्याळ व किंचित् आगाऊ स्वभावामुळे कुठल्याही प्रवासात माझं नडत नसे.

मला माझ्या स्वभावावरून बालपणीची आठवण आली. लहानपणी रांगायला सुरवात करताच वडिलांची दौत पालथी घातली. 'अरे लेका बंड्या!' वडील लोभाने म्हणाले व आमचं नाव बंड्या पडलं. पुढे बरोबरीची मुलं नसल्याने म्हणा किंवा आईबरोबर तिच्या मैत्रिणींशी मिसळण्याच्या योगामुळे म्हणा आम्ही लहानपणापासून सागरगोट्या, फुगड्या, झिम्मा इत्यादि खेळ मुलींच्या चापल्यानं खेळत असू. बाबा तर एकदा दोनदा म्हणाले देखील, 'हा पोऱ्या बायल्या होणार की काय?'' मुली, ''बायकांत पुरुष लांबोडा अन् भाजून खातो कोंबडा'', असं चिडवायच्या तर मी कोंबडा खाण्याची चव तोंडाला आणून त्यांची जिरवायचा.

'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही,' या म्हणीला अनुसरून आजही या म्हातारबुवांची गम्मत करीत सहा तासांचा प्रवास करमणुकीत घालविण्याचा विचार डोक्यात शिरला; पण त्यांच्याकडे पाहतो तो काय? ते समाधिस्थ झालेले होते. मला वाटले 'बडोग' येईपर्यंत त्यांची समाधी किंवा डोळे मिटून चाललेलं ध्यान टिकलं असावं.

त्यांनी डोळे उघडले. माझ्याकडे पाहिले. मी प्रश्न केला, “ महाराज, आपण शिमल्याला राहता का?” त्यांनी मानेनंच होकार दिला व कसलंसं पुस्तक काढून वाचायला सुरुवात केली. ‘तारादेवी’ स्टेशनवर त्यांना वाचा फुटली.

“गेलं हे स्टेशन कोणतं होतं?” त्यांनी प्रश्न केला.

‘तारादेवी,’ एवढेच शब्द उच्चारून मी माझ्या पुस्तकात डोकं खुपसलं. आपण वाचत असलेल्या पुस्तकाबद्दल या महाराजांना सुगावा लागू नये म्हणून माझी चुळबूळ सुरू झाली व त्यात यश येणार नाही असे हेरून मी पुस्तक अटॅचीत कोंबलं.

‘कसलं पुस्तक वाचीत होता ?’

त्यांच्या धारिष्ट्यानं मी चमकलो.

‘अमेरिकन व्ह्यू ऑफ इंडियन फिलॉसफी’, असं धडधडीत खोटं सांगून मी निर्लज्ज पणे त्यांचेकडे पाहू लागलो. ते किंचित हसले. आणि मग शिमला येईपर्यंतच्या ४०-४५ मिनिटांत त्यांनी त्या पुस्तकाविषयी अत्यंत मार्मिक आणि चित्ताकर्षक माहिती दिली. मी मोहून गेलो.

‘आपली पुन्हा भेट घ्यावीशी वाटते,’ असं मी म्हटल्याबरोबर जणू काय पूर्वसूचित अनुमानानुसार त्यांनी खिशातील कार्ड काढले व माझ्या हातावर ठेवले. मी त्यावर एक नजर मारली व ते खिशात कोंबलं. शिमला आला व आमच्या वाटा वेगवेगळ्या झाल्या.

पण महाराजांचे शेवटले शब्द मात्र कानात, मनात आणि हृदयात घुमत राहिले- ‘बावारे, हे जग केवळ मृगजळ आहे, मृगजळ, केवळ भास-असत्य!’

त्यानंतर त्या महात्म्याची भेट झाली ती ‘माल’वर. नित्यनेमाप्रमाणे मालरोडवर भटकत असता लाला लाजपतरायांच्या पुतळ्याशेजारी पांढऱ्या शुभ्र रंगाचे दोन पुतळे दिसत होते. अंधुक प्रकाशात ते पुतळे फारच रमणीय वाटले. जणू काही जीझस आणि मेरी! जवळ जाऊन पाहतो तो महाराज-- त्या दिवशी गाडीत भेटलेले ते सद्‌गृहस्थ व त्यांच्या बरोबर एक स्त्री. वयानुसार ती त्यांची मुलगी असावी, त्या गृहस्थांना मी महाराज, महात्मे असं संबोधलं आहे. वास्तविक ते महाराजही नव्हते अन् महात्मे पण नव्हते. ते एक सुखवस्तू, उतारवयात भक्तिमार्गाला लागलेले निवृत्त वृत्तीचे गृहस्थ होते.

मला गाडीत भेटले ते गृहस्थ.... 'माझी मुलगी सुभद्रा', अगदी थोडक्यातच त्यांनी आम्हा दोघांची ओळख करून दिली. सुभद्रा नाव ऐकल्यावर माझा चावटपणा नकळत जागृत झाला व आपण काय, कुठे व कुणासमोर बोलतो आहोत याचं भान न राहून एकदम शब्द निघून गेले, ''अच्छा! नाव फार छान आहे, नव्या बाटलीत जुनी दारू!''

मुलगी हसली, गृहस्थ गंभीर झाले.

'आला नाहीत तुम्ही दिलेल्या पत्त्यावर?' त्यांनी त्याच गांभीर्यात पण प्रेमळ आवाजात प्रश्न केला! 'हं, काही जमलं नाही, बुवा! पण येईन, अवश्य येईन.' असे माझे उत्तर पूर्ण व्हायच्या आतच, 'येत्या रविवारी या ना,' या सुभद्रेच्या प्रेमळ आमंत्रणाचा मी तत्काळ स्वीकार केला आणि रविवारी त्यांचेकडे गेलो.

जिना चढत असताच उपनिषदातील काही वाक्ये कानावर पडले व मी थबकलो. आबासाहेब-हो त्यांना घरात सर्वजण आबासाहेबच म्हणायचे-आपल्या पत्नीला उपनिषदातील काही भाग समजावून सांगत होते.

चहा झाला, एकमेकांच्या घराण्याचे इतिहास झाले. जेवणाच्या आग्रहाला नाही म्हणवेना-उत्तम भोजन झाले आणि तीनच्या चहानंतर मी घरी जायला निघालो तो पुढील रविवारचं आमंत्रण घेऊनच.

माझ्या आबासाहेबांकडील वाऱ्या अव्याहत सुरू राहिल्या. हिवाळा संपला आणि फाल्गुन मास आला. एक दिवस अचानक टेलिफोन आला, 'उद्या जेवायला याल का?' फोन सुभद्रेचा होता.

'काय आहे उद्या विशेष?' मी पृच्छा केली.

'अय्या! उद्या रंगपंचमी नाही का ?'

शिमल्याचा फाल्गुन मास काही नेहमीच चांगला असतो असं नाही. कधी पाऊस तर कधी गार. ती प्लेनवरील फाल्गुनाची रम्यता पहाडीवर कशी असणार ? पण काय! रंगपंचमी उजाडली ती स्वच्छ ऊन पांघरूनच! अन् त्यांत कुठे तरी रेकॉर्ड लागली होती - 'देखो, भीगे न चोली, भिगोई मोरी सारी रे' मग काय विचारता ? 'आधीच मर्कट तशातही मद्य प्याला' - अशी माझी अवस्था झाल्यास नवल कसलं? निरनिराळ्या रंगांच्या पुड्या घेऊन मी आबासाहेबांचं घर गाठलं. जेवण झालं,

पानसुपारी झाली. आबासाहेब वामकुक्षीला गेले आणि काकू-सुभद्रेच्या मातोश्री-शेजारी रवाना झाल्या. मी चोरपावलांनी सुभद्रेची खोली गाठली. ती नको-नको म्हणत असतानादेखील पुड्यांतील रंग तिच्यावर उधळला. ती किंचाळली; पण लगेच खेळात सामील झाली. रंगाच्या देवाण-घेवाणीला रंग चढला-चढतच गेला. आबासाहेबांसारख्या बुरसटलेल्या म्हाताऱ्याच्या देखरेखीत वाढलेली सुभद्रा बेभान झाली आणि मर्यादेच्या पलीकडे जाण्यासाठी दोघांची पावलं पडण्याच्या आतच....

आबांचा गंभीर आवाज!

'का किंचाळलीस बाळ?' पण मला वाटतं त्यांचं हे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच त्यांनी सर्व प्रकार पाहिला असावा. कोळशावरील राख झाडल्यावर जसा धगधगीत निखारा दिसावा तसले डोळे पाहून मी गांगरलो.

'काय चाललं होतं हे?'

'काही नाही आबा. हा केवळ भ्रम आहे-मृगजळ.' कसेबसे बोलून मी पळ काढला.

त्यानंतर त्या घरी जाण्याची माझी हिम्मत झाली नाही; पण त्यानंतरच माझा व सुभद्रेचा पत्रव्यवहार चालू झाला. चोरटा पत्र-व्यवहार. पहिल्याच पत्रात तिनं आबांची टिंगल केल्याबद्दल माझी चांगलीच हजेरी घेतली. आपण त्या गावचे नाही असे भासवीत माझ्या पहिल्या उत्तराची--

''खत आने लगे शिकवा आमेज उनके, मिलाप उनसे गोया हुआ चाहता है'-सारख्या रंगीन वाक्यानं सुरुवात केली।

पत्रांना पूर आला आणि प्रेमाला ऊत. वेगळीच काळजी लागली- हे थांबणार कुठे आणि कधी आणि कसं? पण म्हणतात न ''ज्याचा कोणीच नाही त्याचा देव वाली असतो.'' बाबांची तार आली-१७ ता.ला दोघंही येत आहोत.

आई आली-बाबा आले. मला सुग्रास अन्न मिळू लागलं.

'उद्या संध्याकाळी कुठं भटकायला जाऊ नको. आपल्याला आबासाहेबांकडे जायचं आहे-' वडिलांनी इशारा दिला.

माझ्या पायाखालची जमीन सरकली. त्या म्हाताऱ्याला पुन्हां तोंड दाखवायला मला लाज वाटू लागली!

'कळलं का मी काय म्हणतो आहे ते?'

'पण बाबा, त्यांच्याकडे माझ्या बरोबरीचं कुणी नाही. मी काय करू तेथे येऊन, मी बोअर होतो तिथं.'

'म्हणूनच एवढी रासलीला रचली वाटतं'?

मी निरुत्तर झालो. काय समजायचं ते समजलो. आबांनी आमच्या तीर्थरूपांकडे झालेल्या प्रकारांची तक्रार केली असावी. कदाचित् अब्रुनुकसानीच्या भरपाईची धमकीही दिली असेल. कुणास ठाऊक, माजी फौजी भाई आहेत आबासाहेब.

'बरं येईन' करीत तेथून निसटलो. कॉटवर एक पत्र पडले होते. सुभद्रेचं पत्र होतं. बॉंबस्फोट होणार या भीतीनंच पत्र उघडलं. पहिल्या वाक्यानंच छाती धडधडू लागली - पण ती धडकन गोड होती.

'ज्या दिवसाची मी आतुरतेने वाट पहात होते तो उद्या उगवणार - उद्या आपला साखरपुडा, कित्ती-कित्ती मजा येईल नाही'.... पत्र लांबलचक होतं. दाबलेल्या भावना उफाळून आलेल्या होत्या. लक्ष शेवटच्या वाक्यावर केन्द्रित झालं-'अन् हे पाहा, खूप-खूप रंगांच्या पुड्या आणाव्या. उद्या रंगपंचमी ना? आपण खूप खेळू. अगदी जिजाबाई आणि शहाजी भोसले प्रमाणे...पण माझ्या आबांची टिंगल करायची नाही हं......'

वडिलांच्या धाकानं मी रंग नेला नाही हे सांगणे न लगे..... पण समारंभ रंगीन झाला यात शंका नाही.

# शामलूभाई

माझा मित्र पवार मला 'शामलूभाई' म्हणायचा. पण मला ते कधीच पटलं नाही. द्वितीय महायुद्धात एम.आय.डी. मिळविलेला इसम शामलूभाई होय? हो! इतकं खरं, की खाण्यापिण्याच्या बाबतीत मी अगदी वैष्णवपंथी होतो.

पवार कोल्हापूरकडचा. 'अनंत' त्याचं नाव. पण आम्ही दोन-चार जवळची मंडळी त्याला 'अंत्या' म्हणत असू. 'मूर्ती लहान पण कीर्ती थोर'हं! पोहणं, खेळणं, पिणं कश्शांत कश्शांत कुणाला हार न जाणारी.

पण त्यानं खरी कमाल केली ती 'बँकॉक' मध्ये. वर्षानुवर्षं 'वर्मा फ्रण्ट' वर अनेक अडचणींना तोंड दिलेल्या फौजा जेव्हा 'बँकॉक'ला आल्या तेव्हा जनरल ईव्हान्सच्या कृपेनं त्यांना खूप सवलती मिळाल्या. अंत्यानं त्याचा फायदा घेऊन कॅबरे लाईफ सुरू केलं. बँकॉकशी त्याचा परिचय करून देणारा होता किंनसिया, माझा सयामी टायपिस्ट. किंनसिया फारच देखणा पोरगा होता. ठेंगणा पण रुंद, रंगाने पिवळा धमक, चपटं नाक पण डोळे मात्र टपोरे. त्याची आई सयामी व वडील चिनी होते. पण डोळे मात्र अगदी भारतीय! रवि वर्माच्या चित्रांत दिसावे तसे!

माझ्याच खोलीत अंत्याचं बिऱ्हाड असायचं. रात्री बारा साडेबाराला स्वारी झिंगून यायची. 'काय दादा झोपलात का?' म्हणून रोज विचारायचा व मग मी, 'काय अंत्या, काय हा उशीर! काय खडखड धडधड!' रोजच म्हणायचा अन् तो— 'दादा, सॉरी हं!' रोज. अगदी रोजचं होऊन बसलं होतं हे.

'हं, काय दादा, आज रामायणात कोणता भाग निघाला?' जणू काय आपल्या पापाची खंत वाटून त्याला मध्यरात्री त्या एकवचनी, एकपत्नी अन् एकबाणी पुरुषोत्तमाची आठवण यायची.

सायंकाळी ७-३० ते १० आम्ही काही मंडळी कधी तुलसी रामायण, कधी दोहावली व कधी कवितावलीचा आस्वाद चाखत असू. मला वाटतं नेमकं त्याच वेळी अंत्या बँकॉक व्हिस्कीचे पेग उडवीत असावा.

काही तरी बोलायला विषय काढण्याच्या उद्देशानं अंत्याची ती वरील विचारपूस

असायची व मग मी मात्र मुद्याला हात घालावा.

'ते जाऊ दे रे. आज तू कोणत्या गोपिकेबरोबर होतास ते सांग आधी. दारूच्या तोंडानं रामनाम नको बाटवूस उगीच.'

अंत्याची रेकॉर्ड चालू करायला एवढीच किल्ली पुरेशी होती. अन् मग ते चऱ्हाट दोन अडीच तास चालायचं. कधी कधी, तो सांगत असतानाच मला झोप लागून जायची, कधी तो झोपला तरी मी जागा राहून कसला तरी विचार करीत पडायचा.

'कसला तरी' कशाचा? अंत्याचं उच्छृंखल जीवन, माझी पत्नी अन् तीन-चार वर्षांची गोजिरवाणी मुलगी कल्पना—यापलीकडे माझं उड्डाण सहसा नसायचं. अंत्याविषयी मला वाईट वाटायचं. प्रथम-प्रथम त्याला लगाम घालण्याचा मी बराच प्रयत्न केला. पण पुढे तो अगदी बेलगाम झाला व मी हा विषय काढणंच सोडलं.

त्यावेळचं बँकॉक आणि आजचं बँकॉक यांत फारच फरक झाला आहे. त्या कांळी त्या शहराला व्हेनिस ऑफ दी ईस्ट म्हणायचे कारण गावभर कालवेच कालवे. जिकडे तिकडे पाणी आणि जणू काही पाण्यावर वसविलेली ती रम्य विशाल नगरी. जिकडे तिकडे हॉटेल्स् व कॅबरे. जणू ऊत आला होता त्यांना. बँकॉकची रात्र आणि पॅरिसची रात्र यांतील फरक त्या दोन्हीचा अनुभव घेतलेलाच समजू शकतो.

मी जरी सर्व शहराची टेहाळणी केली होती तरी रात्रीचं बँकॉक मला अंत्याकडूनच कळलं होतं.

त्यानं 'लुंबनी पार्क'चं वर्णन सुरू केलं की त्याला काय अवसान चढायचं म्हणून सांगू. ते वर्णन मला लवकरच अगदी तोंडपाठ झालं होतं. मी केव्हाही त्या भागात गेलो असतो तर तो पार्क अगदी अचूक ओळखला असता इतकी उजळणी झाली होती माझी.

एकदा वाटलं बघावं तरी खरंच अंत्या म्हणतो तसा स्वर्ग आहे का तिथं?

'अहो काय सांगू दादा? काय जागा आहे ती? अगदी मस्त! काय तो चौक, काय त्या चारीकडे उभ्या असलेल्या रिक्षा, त्या रिक्षांतील सुन्दर तरुणी, तो बगीचा, त्याच्यातील ते छोटे-छोटे स्वतंत्र उद्यान. ती तेथील शिस्त, तो तलाव. त्यात चाललेला नौका-विहार आणि विलास. काय काय सांगू तुम्हाला?'

एकदा अंत्यानं हिम्मत केलीच— 'दादा, चला. अगदी एकदाच चला तिथं.

पुन्हा जावंसं वाटलं नाही तर मी अगदी माझं नाव बदलून टाकीन. अन् गेलात तर तुमचं नाव पण बदलेन बघा.'

'माझं कसं रे?' मी विचारलं.

त्यानं जीभ चावून हळूच म्हटलं, 'मी तुम्हाला पुन्हा शामलूभाई म्हणणार नाही.'

अन् मग आम्ही दोघंही खूप हसलो. अंत्याला झोप लागली, पण माझी झोप मात्र साफ उडाली.

दुसरे दिवशी अंत्या संध्याकाळी बाहेर जायची तयारी करू लागला तसं मी त्याला म्हटलं, 'येऊ का रे अंत्या आज तुझ्याबरोबर?' त्यानं सऽऽ केलं. त्याच्या गालाला ब्लेड लागली असावी.

आणि मग मी त्याच्याबरोबर जाण्याची तयारी करू लागलो. मला सजविण्याचं काम अंत्यानंच केलं.

गेटवर आलो तेव्हा एका शिपायानं एक रजिस्टर माझ्यापुढे केलं व एक कसलंसं छोटंसं पॅकेट माझ्या हाती दिले. मी अंत्याकडे पाहिलं. त्यानं खुलासा केला, 'बाहेर पडताना प्रत्येकानं या रजिस्टरवर आपलं नाव लिहायचं अन् सांसर्गिक रोगापासून बचाव करण्यासाठी हे पॅकेट न्यायचं.'

माझ्या प्रतिष्ठेला हे मानवण्यासारखं नव्हतं. मी खोलीकडे परतलो. अंत्या फार निराश झाला.

दुसऱ्या दिवशी मी 'लुंबनी पार्क'ला जाण्याचं अगदी निश्चित केलं. रजिस्टरवरचं नाव आणि ते पी.ए.पॅकेट कसं टाळावं याचा खूप विचार केला. युक्ती सुचली. अगदी नामी युक्ती. डेपो चालू असताच जर आपण बाहेर पडू शकलो तर हे साधण्यासारखं होतं.

किंनसियाला बरोबर घेतले अन् बाहेर पडलो. आधी एक हॉटेल गाठले. त्यात चहा-पाणी चालू असताना किंनसियाला विश्वासात घेतले. मला वाटलं होतं, त्याला या कल्पनेनं धक्काच बसेल. पण तसं काहीच झालं नाही. त्याला या गोष्टी नेहमीच्या असाव्यात.

'लुंबनी पार्क'चा मेळा साधारण आठ वाजल्यापासून सुरू होतो तो मध्यरात्र

उलटून जाईपर्यंत चालतो. मध्यंतरीचा काळ बाजारात भटकण्यात घालविला. किंनसियाच्च्या ओळखीनं एका जवाहिऱ्याकडून एक सुबक-सुन्दर सोन्याची साखळी घेतली. पत्नीसाठी. जणू पत्नीच्च्या फसवणुकीचं परिमार्जन —'गरीब बिचारी, तिची भरपाई करायलाच हवी.'

आठ केव्हा वाजले कळलंच नाही. त्या भव्य चौकात आमची रिक्षा थांबताच किंनसिया खाली उतरला व मला तेथील माहिती सांगायची ती सांगून तो तेथून सटकला. मी हळूहळू, भीत-भीत त्या चौकाकडे गेलो. मान कापायला नेत असलेल्या बकऱ्यागत माझी अवस्था झाली होती. आता माघार घ्यायची नाही हा अगदी निश्चयच केला होता मी.

चौकाच्च्या मध्यभागी एक गोल चबुतरा होता. त्याच्च्या चौफेर असंख्य रिक्षा उभ्या होत्या. उजेडाची व्यवस्था अशी काही मजेदार केली होती की रिक्षातील व्यक्तीला प्रथम तिच्याकडे येणारी आकृती आधी दिसावी अन् मग तुम्ही अगदी रिक्षात तोंड घातल्यावर तुम्हाला रिक्षातील व्यक्ती दिसावी. रिक्षातील स्त्रीला तिच्याकडे येणारा इसम परिचित असला किंवा नको असला तर ती रिक्षावाल्याला तेथून चटकन् रिक्षा हलवायला सांगू शकत असे.

मी अगदी पहिल्याच रिक्षातील रमणीला 'थबलाय बाथ'? (किती?) असा पुसट प्रश्न विचारला अन् उत्तराची वाट न पहाता रिक्षात प्रवेश केला. पार्कच्या दिशेनं रिक्षा जाऊ लागली. लवकरच ती रिक्षा एका कुंपणापाशी पोहोचली. आम्ही खाली उतरलो व आत प्रवेश केला. चौफेर मेंहदीचं उंच कुंपण असलेल्या त्या जागेत मध्यभागी एक संगमरवरी बाक होता. त्याच्या एका कोपऱ्यात अशोकाचा एक विशाल वृक्ष. त्या वृक्षामागे असलेला चन्द्र इतरत्र प्रकाश देत होता; पण नेमका त्या बाकड्यावरच अंधार होता.

'छलंस्त्रंग' राजानं स्वत:च्या रासक्रीडेसाठी निर्माण केलेल्या त्या विशाल उद्यानाची शोभा पाहण्यात मी इतका मग्न झालो होतो की त्या रमणीनं माझा डावा हात आपल्या मऊ पंजानं हळूच दाबला त्या वेळी झोपेतून दचकून जागा झाल्यागत माझी अवस्था आली.

आम्ही त्या बाकावर बसलो. तिची मूर्ती अगदी लहानशी, ठेंगणी होती. रंग

अर्थातच गोरा होता. अंधारात वयाचा अंदाज लागणे कठिण होते. तिचं निरीक्षण करण्याच्या हेतूनं मी खिशातून सिग्रेट काढली व माचिस उघडली. ती काडी विझली. दुसरीही विझली तेव्हा माझ्या ध्यानात आलं, की ती स्त्री काडीवर अगदी नाजुक फुंकर मारून विझवीत होती. मी आगपेटी आणि सिग्रेटकेस खिशात ठेवली तशी ती खुदकन हसली.

'तुझं नाव काय?' मी प्रश्न केला.

अत्यंत मृदु आवाजांत तिनं 'सुवी'असं सांगितलं. आगपेटीची काडी विझत असताना तिच्या डोळ्याकडे माझे लक्ष गेलं होतं. ते डोळे सयामी अगर चिनी नव्हते. मी तिला त्याबद्दल विचारलं. तिचे वडील दक्षिण भारतीय होते.

भारताचं नाव निघताच मला माझ्या पत्नीची आणि मुलीची तीव्र आठवण झाली. मी खिशातून पैशाचं पाकीट काढलं. तिच्या हातावर शंभर टिकलची नोट ठेवली. नोट काढीत असता सोन्याच्या साखळीचं पाकीट बाहेर आलं होतं. ते तिनं मजजवळून घेतलं व मी काही बोलणार तोच 'खोपचाय थन मकमा'(थँक यू व्हेरी मच) असं म्हणत तिनं साखळी स्वत. च्या गळ्यात अडकविली. एक शब्द न बोलता मी तिथून उठलो अन् सप् सप् पाऊलं टाकीत, जवळ-जवळ धावतच म्हणा ना— दिसेल त्या रिक्षात उडी टाकली अन् खोलीचा पत्ता सांगितला.

रात्री घडलेल्या प्रसंगामुळे दुसरे दिवशी मला दिवसभर कसंसंच होत होतं. आज किंनसियानं टंकलेखनात केलेल्या असंख्य चुका माफच केल्या जात होत्या. शेवटी मी त्याला बोलावून विचारलं.

'तुला बरं नसेल तर सुटी घेऊन घरी जा.'

लंचच्या सुटीत किंनसिया माझ्या जवळ आला. मी त्याला खुर्चीवर बसण्याचा इशारा केला.

'सर, तुमचं काही हरवलं आहे का ?'

मी खिसे चाचपले. साखरपुड्याला मिळालेली अंगठी बोटातच होती. सर्व काही जागेवर होतं.

मी नकारार्थी मान हलविली.

त्यानं खिशात हात घालून एक पुरचुंडी बाहेर काढली. त्यात माझी सोन्याची

साखळी.

'कुठं मिळाली तुला ?'

'माझ्या आईजवळ.'

'तिनं तुला परत करायला दिली.'

'छे! मी तिच्या जवळून हिसकावून आणली.'

तो बोलत होता पण लाजेनं अर्धमेला झाला होता.

क्षणात तो उठून उभा राहिला. माझ्या टेबलावर एक कागद ठेवून भर्रकन् खोलीबाहेर पडला. तो त्याचा राजीनामा होता. त्याला हाक मारून कालच्या प्रकाराचा खुलासा करावा असे विचार माझ्या मनात आले. पण काही तरी विसरल्यागत तो पुन्हा मागे फिरला.

'अरे पण किंनसिया.......'

'मला ठाऊक आहे सर,' असं म्हणून एक शंभराची नोट माझ्या टेबलावर ठेवून तो पळतच निघाला. त्या नंतर तो मला कधीच दिसला नाही.

त्याच्या सुन्दर डोळ्यांचा क्षणातच मला उलगडा झाला. पण...

हा सर्व प्रकार ऐकून अंत्या मला शामलूभाई म्हणणार हे माहीत असूनही मी त्याला सर्व प्रकार सांगितला.

आणि एक दीर्घ नि:श्वास घेऊन तो उद्‌गारला —'अखेर शामलूभाईच तुम्ही!'

# दैवयोग

'इतिहासाची पुनरावृत्ती' होते म्हणतात. सतराव्या शतकात नारायण कुलकर्णी नावाचा एक तरणा पोरगा 'सावधान' शब्द ऐकल्याबरोबर सावध झाला आणि बोहल्यावरून पलायन करून कुठे गुप्त झाला तो कालांतरानं 'रामदास' नावानं प्रगट झाला याला इतिहास साक्ष आहे.

विसाव्या शतकात पण नारायण कुलकर्णी नावाचा एक धड मिसरूडही न फुटलेला, विशीतील तरुण विद्यार्थी, थोड्या-बहुत फरकानं असाच पळाला. फरक एवढाच की तो नारायण 'सावधान' ऐकून पळाला आणि हा नारायण अंतरपाट दूर झाल्यावर, गळ्यात माळ टाकण्याऐवजी ती तशीच जमिनीवर टाकून पळाला. यांतही दोन मतं आहेत. कोणी म्हणतं नारायणानं माळ मुलीच्या गळ्यापर्यंत नेली. तिचा चेहरा पाहिला मात्र अन् माळ तशीच सोडून पळाला. तर भटजी म्हणतात त्यानं तिच्या गळ्यात माळ टाकली होती.

काही का असेना, उद्याचा इतिहासकार हेच म्हणणार की 'या' नारायणानं बोहल्यावरून पलायन केलं आणि नरेन्द्र कुमार या नावानं तो सन् १९३८ मध्ये सैन्यात प्रगट झाला तो 'गनर' म्हणून.

१९३९ मध्ये दुसरं महायुद्ध भडकलं. नरेंद्र कुमार आपल्या पल्टणीबरोबर 'पायदळ' मध्ये गेला. गनरचा नाईक, नायकाचा हवालदार, पुढे जमादार (अर्थात् आजचा नायब-सुभेदार) आणि १९४६ मध्ये कप्तान झाला.

पलटणी भारतात परतल्या. नरेंद्र कुमार पण परत आला. गावी गेल्यावर त्याला आपले आई-वडील वारल्याची दु:खद वार्ता मामा-मामी कडून कळली. मामा-मामीचं ते तिखटमीठ लावून केलेलं वर्णन, त्याला ऐकण्याचा अगदी कंटाळा आला होता. काय म्हणे, 'फौजदार साहेबांनी' (नरेंद्राचे वडील) आपल्या चाराच्या आकड्याप्रमाणे वळविलेल्या मिशा खाली लोंबकळत ठेवल्या. 'नारायणनं आपलं नाक कापलं' असेच ते वारंवार म्हणायचे. त्यांतच त्यांनी हाय खाल्ली. व्याह्यानं दिलेला ५००० रुपये हुंडा आणि वीस तोळे सोनं परत मागितलं. ज्या घराचं कर्ज फेडण्यासाठी

त्यांनी हा पाच हजार हुंडा घेतला होता. ते गहाण पडले.

..... ही मानहानी सहन न झाल्यामुळे ते जे खंगत गेले ते उठलेच नाही. मागोमाग त्या माऊलीनं पण पाय काढला... इत्यादी-इत्यादी.

तेथील दोन दिवसांच्या वास्तव्यातच नारायण ऊर्फ कॅप्टन नरेंद्र कुमार कंटाळला. त्यानं सावकाराचा शोध लावला. सव्याज रक्कम परत करून घर ताब्यात घेतलं आणि आपल्या 'फियाट ऑक्सन' मध्ये सामान टाकून लोणावळ्याचा मार्ग धरला.

गाडी भरधाव चालली होती. गाडीचं वेगदर्शक चक्र आणि नरेंद्राचे विचारचक्र यात जलद काय चाललं होतं हे सांगणं कठीण होतं.

त्याला आठ वर्षांपूर्वीचा तो काळ भराभर आठवू लागला...

"पण मी म्हणते, नारूला बी.ए. होऊ द्यायचं अन् मग लग्न करायचं"—त्याची आई म्हणाली.

"नाही. तो इंटर झाला आहे. सागर ट्रेनिंगला पाठवायचं ठरवलं आहे मी" ठाम, निश्चयी आवाज—त्याचे वडील.

"बरं तसं का होईना; पण लग्नाची बेडी कशाला त्याच्या पायांत एव्हाच?"—आई.

'घरातली इज्जत घरांत राहावी म्हणून. देशपांडेकडून मी घरासाठी पाच हजार घेतले होते. ते हुंड्यात वळवायचे. २० तोळे सोनं येतं आहे घरांत चांगलं अन् सोन्यासारखी त्यांची मालिनी पण."—वडील.

"मुलगी काळी आहे अन् ठेंगणी पण"— आई.....कचरतच.

आपल्या करारी वडिलांपुढे आपल्याला व आपल्या आईला माघार घ्यावी लागणार हे नारायण समजून होता.

त्यानंतर तो बोहल्यावर उभा असतानाचे चित्र आले त्याच्या डोळ्यासमोर. मंगलाष्टकं चालू आहेत. मागे मित्रांचा घोळका फुसफुसत आहे—'अरे भलतीच काळी आहे रे.'

'या ऽऽ नाऱ्यानं कशी काय संमती दिली या लग्नाला.' 'अरे त्या वाघापुढे काय चालणार आहे त्याचे'. 'पैसा. बाबा पैसा. काळ्याचं गोरं अन् गोऱ्याचं काळं करणारा पैसा.'

समोर बैलगाडी आल्यानं नरेंद्रानं ब्रेक दाबला तसा त्याच्या विचारचक्राला पण ब्रेक लागला.

वर्षामागे वर्षं लोटत गेली. नरेंद्र वाढतच गेला. हुद्यानं, मानानं आणि पैशानं पण आणि मधूनच त्याला आई-वडिलांची आठवण यायची. 'आपलं वैभव पाहायला आज आई-बाबा असते तर?'

मालिनीची त्याला कधी आठवण आली की नाही कुणास ठाऊक.

फौजी जीवनातील मित्र-मंडळीत तो फारसा लोकप्रिय होऊ शकला नाही. परिस्थितीमुळे त्याचा स्वभाव एकलकोंडा, राखीव अन् किंचित् कडवट झाला असावा.

पण म्हणतात, त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्नी सौ. डिसूझांचा तो अगदी आवडता बॉयफ्रेण्ड होता. त्याच्या तोंडून एखादं विनोदी वाक्य ऐकल्याचं काही कुणाला आठवत नसे. पण एकदा सौ.डिसूझांनी दिलेल्या पेयाच्या चषकांत त्याला एक केस दिसला.

'साकी, हमारे जाम में क्यों बाल पड गया?' असा प्रश्न म्हणे अगदी डिसूझांसमोर त्यानं केला. अन् लगेच, 'हरकत नाही. या केसाला शॅम्पूचा वास येतो आहे. 'गैर का' दिसत नाही.' असं स्पष्टीकरण केल्यावर ती मैफिल म्हणे खूप हसली.

अन् तो लेफ्टनंट कर्नल म्हणून रिटायर झाला त्या वेळी त्याचं वय जेमतेम पंचेचाळीस वर्षांचं असेल. ब्रह्मचारी जीवन, काटेकोर वागणूक यामुळे बरीच माया असावी त्याच्या जवळ. त्याच्या बरोबर सेवानिवृत्त झालेले त्याचे सहाध्यायी पुन्हा नोकरीच्या शोधात लागले. भाड्याची घरं धुंडाळू लागले. नरेंद्र मात्र मुंबईला स्वत:च्या फ्लॅटमध्ये राहायला आला. नवी-कोरी 'फियाट', वेल-फर्निशड फ्लॅट. घरात कामाला दिवसभराची बाई-काशीबाई.

अन् एक दिवस अंधेरीच्या त्या भागांतील फ्लॅटसमध्ये वावटळच उठली. रिटायर्ड लेफ्टनंट कर्नल नरेंद्र कुमार काशीबाईला घेऊन माथेरानला 'हनीमून' साठी गेले म्हणून. 'का हो ऐकलं का?' असं म्हणून एकीनं सुरुवात करायची. अन् 'तो गणोबा सांगत होता बाई.' असा त्या वाक्याचा शेवट व्हायचा.

आणि गणोबा म्हणजे तेथील चौकीदार. सावळा रंग, बुटकी मूर्ती. पोलिसचा

सेवानिवृत्त शिपाई. वय साठच्या पलीकडे अन् विशाल उदरात मुंबईच्या इत्थंभूत बातम्या.

गोष्ट काही अंशी खरी होती ती. काशीबाईनं नरेंद्राची फार चोख व्यवस्था ठेवली होती. त्याच्या शिस्तीत ती लवकरच मिसळून गेली होती. वेळेवर चहा. आंघोळीला गरम पाणी वेळेवर. बुटाला पॉलिश. चविष्ट अन्न. कुठेऽकुठेऽ कसर ठेवली नव्हती तिनं त्याच्या व्यवस्थेत.

तो 'फ्लू' नं आजारी झाला असताना तर तिनें जीवापाड सेवा केली त्याची. आणि भांडी घासणारी बाई बोलते ना त्यापेक्षा तिचं मराठी पुष्कळच सुसंस्कृत होतं.

'सातवी पास आहे' गणोबानं गौप्यस्फोट केला होता त्या आसमंतातील फ्लॅट्समध्ये.

पण नरेंद्रानं तिला माथेरानला पळवून नेलं ही गोष्ट खरी आहे का? खरी आहे. पण गणोबानं पसरविली तशी मात्र नव्हे.

नरेंद्र मावशीकडे गेला असता 'अरे नारू' म्हणून मावशीनं बऱ्याच जुन्या गोष्टींची उजळणी केली होती. त्यात त्याच्या लग्नाची गोष्ट पण निघाली. त्याची सासुरवाडी तिकडल्याच भागाची होती. देशपांडे कुटुंबाची कशी वासलात लागली इत्यादी विषयावर मावशीनं बरंच प्रवचन केलं होतं. मावशी खूप बोलत राहिली. पण नरेंद्रचं सगळं लक्ष 'मावशीच्या एकाद्या मुलाला आपण दत्तक घेतलं तर?' या विचारावर.

'बिचारी विधवा मावशी बऱ्याच अडचणीत दिवस काढत आहे. आपण थोडा हातभार लावला तर!' अशा कितीतरी स्वत:च्या प्रश्नांना स्वत:च उत्तर देत असता—

'अरे नारू, तुला कळलं का रे? तुझी मालिनी बिचारी मुंबईच्या कापडगिरणीत मजुरी करते आहे.'

या वाक्यानं त्याची तंद्री भंग झाली होती. पंधरा-सोळा वर्षांपूर्वी मामांकडे झाली तशीच त्याच त्या भाकडकथांची पुनरावृत्ती सहन न होऊन नरेंद्र दुसरे दिवशी सकाळीच मुंबईला परत आला.

सकाळी अकराचा सुमार असेल. तो फ्लॅटमध्ये शिरला तेव्हा काशीबाई नित्य व्यवसायात मग्न होती. नरेंद्रानं कपडे बदलले. आपल्या खोलीत गेला. टेलीफोन



Indian Institute of Advanced Study
Acc. No. G-5049
D... 24/7/2003

डिरेक्टरी मधून सगळ्या कापड गिरण्यांचे पत्ते लिहून घेतले आणि सौ. मालिनी कुलकर्णीला त्यांच्यामार्फत एक एक कार्ड घातलं. अगदी मोघम—

'वरील पत्त्यावर शक्य तितक्या लवकर भेटावं अगर पत्रव्यवहार करावा.'

- लेफ्टनंट कर्नल नरेंद्र कुमार

ती सगळी कार्डं लिहून झाल्यावर त्यानं काशीबाईला हाक मारून ती जवळच्या पोस्टाच्या पेटीत टाकायला दिली.

काशीबाई पत्रांची विल्हेवाट लावून परत आली. दुपारची जेवणं झाली. वामकुक्षीसाठी नरेंद्र आपल्या शयनगृहात गेला.

अर्धा तास झाला असेल नसेल तर कमरेला बोचकं टेकविलेली काशीबाई त्याच्या शयनगृहात शिरली.

'साहेब, मी आजपासून काम सोडलं.'

बस्स्, इतकं बोलून ती बाहेर पडली. झाल्या दिवसांचे पैसे मागितले नाहीत की काही नाही.

नरेंद पाहतच राहिला. चहाच्या वेळेला उठला. स्वहस्ते चहा करून प्यायला. कपडे बदलले आणि बाहेर पडला. गाडीचं दार उघडून आत बसणार इतक्यात त्याला 'फुटबोर्ड' जवळ त्याच्या सहीचा एक कागदाचा कपटा दिसला. उचलून तो न्याहाळू लागला.

नक्कीच! सकाळी लिहिलेल्या पोस्टकार्ड पैकी एकाचा जळका तुकडा होता तो. त्याला कसलाच बोध होईना. 'हं! आपली सकाळची कार्डं काशीबाईनं जाळली तर.' पण का?

'काशीबाई आजकाल आपल्याकडे स्नेहाळ नजरेनं पहाते' असा त्याला मधूनच संशय येऊ लागला होता. पण संशयच! उलट आपणच काशीबाईच्या पाठमोऱ्या आकृतीकडे चोरून पाहतो हे सत्यदेखील त्याला पटेना.

गणोबाकडून काशीबाईचा अर्धवट पत्ता घेऊन नरेंद्रानं गाडी त्या दिशेला सोडली. बऱ्याच हेलपाट्यानंतर त्याला कळलं की सुतिकागृहाच्या मागील खोल्यात एक सुन्दराबाई नावाची नर्स आपल्या बहिणीबरोबर राहते. पण काशीबाई नावाच्या बाईचा पत्ता त्याला लागला नाही.

शेवटचा प्रयत्न म्हणून तो सुन्दराबाईच्या खोलीकडे वळला. कॉल-बेल वाजविली. एक पन्नाशीच्या घरातील विधवा स्त्री बाहेर आली.

'कोण हवं आहे आपल्याला ?'

'इथं काशीबाई नावाच्या कुणी राहतात का ?'

'नाही.'

'पण मला हाच पत्ता देण्यात आला होता.'

'पत्ता चुकीचा दिसतो.'

'आपली कोणी बहीण राहते का आपल्याजवळ ?'

'हो. माझी धाकटी बहीण मालिनी असते माझ्या जवळ.'

'कोण? मालिनी कुलकर्णी ?'

'हो. आपल्याला कसं कळलं तिचं नाव ?'

'सांगतो. पण आत येऊ का ?'

'या', म्हणून सुन्दराबाई थोड्या सरकल्या.

नरेन्द्र आंत गेला व बाहेर आला तो चेहऱ्यावर एक निश्चय, एक आनन्द घेऊनच.

आणि नारायण कुलकर्णी ऊर्फ नरेंद्र कुमार. सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल माथेरानला हनीमूनसाठी गेले ते काशीबाई मोलकरीण ऊर्फ सौ. मालिनीबाई कुलकर्णी यांना घेऊन.

म्हणजे गणोबाच्या वार्ता-विहारात काही ना काही तथ्य असतं तर!

# हिरवा चाफा

त्या दिवशी क्लासमधून बाहेर पडायला मला फार उशीर झाला होता. धावत-पळत कसंबसं स्टेशन गाठलं आणि लोकलच्या समोरच्याच डब्यात चढलो. अन् मनातली पाल चुकचुकली. डबा शब्दश: रिकामा होता. तो पहिल्या वर्गाचा डबा असल्यामुळे आणि आडनीड वेळ असल्यामुळे त्या वेळी यात उतारू नसावेत. पण माझ्या जवळ तर तिकिट तिसऱ्या वर्गाचं !

मुंबईला येऊन मला जेमतेम दोन महिनेच झाले होते. लोकलच्या प्रवासात अजून मी मुरलेला नव्हतो. तिकिट चेकिंगच्या व्यवस्थेविषयी मी अनभिज्ञ होतो. कुठं तरी एका कोपऱ्यात लपून बसावं आणि मालाड आल्यावर चटकन् बाहेर पडावं अशा विचारात मी डावीकडे वळलो आणि कोपऱ्यातील एक बाकडं गाठलं. बॅगमधून पेपर काढला आणि वाचायला सुरुवात करणार तोच पलीकडील कोपऱ्यात नजर गेली. म्हणजे ! मी काही डब्यात एकटा नव्हतो तर? त्या कोपऱ्यात केशरी साडी नेसलेली एक तरुणी बसली होती. तिची आकृती अत्यंत आकर्षक वाटली आणि मी तिच्याकडे टक लावून पाहू लागलो. पण जनाची नसली (कारण तिथं जन असं कुणीच नव्हतं) तरी मनाची लाज असते ना? तिचा चेहरा जरा हलला की मी मान वळवून बाहेर बघू लागे. मला वाटलं तिच्या हे ध्यानात आलं असावं. कारण जणू काही तिला न्याहाळता यावं म्हणूनच की काय तिनं उजवीकडे जी मान वळती केली ती इकडे वळविलीच नाही. पण कदाचित् आपला चेहरा मला दिसू नये असाही तिचा उद्देश असावा. कुणास ठाऊक!

तिच्या भरगच्च अंबाड्यावर एक हिरव्या चाफ्याचं फूल होते. वास्तविक मी कंपार्टमेंट मध्ये प्रवेश करताच मला हिरव्या चाफ्याचा सुगंध आला होता. पण त्या वेळी मी गांगरलेल्या मन:स्थितीत असल्यामुळे माझ्या ते ध्यानात आलं नसावं. मला वाटतं मालाडपर्यंत तिनं इकडे मान वळविली नसावी. अन् मालाड आल्यावर मात्र ती विजेसारखी केव्हा उतरून गेली मला कळलंसुद्धा नाही.

आज बुधवार. 'इंटेलिजन्स कोर्स'चा आज माझा तिसरा दिवस. अडीचला क्लास सुटला आणि मी स्टेशनवर आलो. आपण काय केलं हे कळायच्या आतच मी पहिल्या वर्गाचं तिकीट घेतलं पण होतं, आणि कालच्याच डब्यात प्रवेश केला

होता. आजही डबा रिकामाच दिसला. पण जणू काही माझे पहिल्या वर्गाच्या तिकिटाचे पैसे वाया जाऊ नये असाच योगायोग होता. कारण कालची ती तरुणी त्याच जागी बसलेली दिसली. पण आश्चर्य वाटलं ते वेगळंच. आज पण तिनं केशरी रंगाची, हिरव्या किनारीची साडी परिधान केलेली होती. आणि अंबाड्यावर हिरव्या चाफ्याचे फूल. काल ती माझ्या समोर मालाडला उतरली नसती तर कालपासून ती इथंच बसून होती की काय असा मला खचित संशय आला असता.

काल, स्टेशन आलं की वर्तमानपत्र उजव्या कनपटीवर लावून बसत प्रवास केला. आज त्याची काहीच आवश्यकता नव्हती. आज मी पहिल्या वर्गाचं तिकीट घेतलेलं होतं. तोंड लपविण्याचं काहीच कारण नव्हतं. आज मी वाट बघत होतो ती तिच्या कालच्या 'पोझ'ची— उजवीकडे तोंड वळलेलं अन् अंबाड्यावरील हिरवा चाफा पण तसं काहीच झालं नाही. ती मधून-मधून माझ्याकडे बघायची अन् त्या मुळे माझी बरीच अडचण होऊ लागली. मनाची लाज वाटू लागली.

तिसरा दिवस. गुरुवार. तीच वेळ. तीच लोकल. तोच डबा. तीच तरुणी. तोच बाक. तोच मी. अन् तोच माझ्या समोरचा बाक. त्याच रंगाची साडी. तेच हिरव्या चाफ्याचं फूल. तिला त्याच रंगाच्या साडीचं एवढं आकर्षण का होतं कुणास ठाऊक! मला वाटतं ती कुठेतरी मॉडेल म्हणून काम करीत असावी. क्षणभर मला त्या चित्रकाराचा हेवा वाटला.

पण आज परिस्थिती किंचित् बदलली. मी माझ्या जागेवर येऊन बसलो, मात्र ती उठून माझ्या समोरच्या बाकावर आली. क्षणभर माझ्याकडे पाहिले आणि बोलण्यासाठी ओठ उघडले. अरे बापरे! काय सुंदर दंतपंक्ती! कुंदकळ्यांशी तुलना करणं म्हणजे त्या दातांचा अपमान करण्यासारखं होतं आणि एवढ्यात ती काय बोलली, मला कळलंसुद्धा नाही.

'काय म्हणालात?' मी पृच्छा केली.

'कुठपर्यंत जाणार?'

'मालाडपर्यंत.'

'आर्मीत असता?'

'होय.'

माझा गणवेश बघूनही तिनं हा प्रश्न का करावा, मला कळले नाही. पण पुष्कळ वेळा आपण उगीचच एखाद्याला असाच काहीतरी अर्थहीन प्रश्न विचारतो ना?

तसलाच प्रकार.

तिच्या पुढच्या प्रश्नाकडे मी कान टवकारले. पण मालाड येईपर्यंत ती काहीच बोलली नाही.

माझा 'कोर्स' एक महिना चालणार होता. म्हणजे तीस दिवस. त्यातले चार दिवस गेलेले. राहिले २६ दिवस. त्यांत चार रविवार जाणार. उरलेले चोवीस दिवस असेच जातील का ? मला प्रश्न पडला. निदान जावेत असं खूप-खूप वाटू लागलं.

दिवसांमागून दिवस जाऊ लागले. अगदी तसेच. तीच गाडी, तीच वेळ, तोच डबा. तीच ती, तोच मी.

एक दिवस ती पुन्हा बोलली —

'तुम्ही याच डब्यात का चढता ?'

'हाच प्रश्न मी पण तुम्हाला करू शकतो.'

तिनं पुसट स्मित केलं. मला वाटते तिच्या चेहऱ्यावर किंचित् भीती, किंचित् गांभीर्य याच्या अस्पष्ट छटा मला दिसल्या. भासही असेल कदाचित्.

संभाषण बंद पडू नये म्हणून मी पुढे बोलायला सुरुवात केली. 'खरं सांगू? पहिल्या दिवशी चुकून डब्यात शिरलो. दुसऱ्या दिवशी तुम्ही येथे आहात का म्हणून बघायला शिरलो. अन् नंतर — तुम्ही इथंच असता म्हणून येत आहे.'

'अन् असं किती दिवस चालणार?' — ती.

'तीस जूनपर्यंत'. — मी.

'आणि रोज याच डब्यात बसणार?'

'हो'. — मी.

'का ?' — ती.

'तुम्हाला सोबत म्हणून.'

आणि ती एकदम ओरडली.

'नको.... मला सोबत नको. त्या दिवशी तो असंच म्हणाला आणि.....'

तिनं दोन्ही हातांनी आपलं तोंड झाकून घेतलं. मालाड आलं. आणि आम्ही दोघंही आपल्या मार्गाला लागलो. त्यानंतर मी पुन्हा त्या डब्यात शिरलो नाही. माझ्या शिक्षित मनाला ते खरंच वाटेना. आणि १५ जूनला तो प्रकार घडला नसता तर मी तिला पार विसरून गेलो असतो.

१५ जून [illegible] रोजी माझी ती गाडी चुकली. त्या नंतरच्या लोकलमधून

प्रवास करून मी मालाडला पोहोचलो तो प्लॅटफॉर्मवर खूप गर्दी झालेली दिसली. काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी मी पण बघ्यांच्या गर्दीत घुसण्याचा प्रयत्न करू लागलो. विचारपूस करता कळलं की कुणी एक स्त्री दुर्घटना होऊन गतप्राण झाली होती. माझी जिज्ञासा जागृत झाली व मी गर्दीत घुसलोच.

प्लॅटफॉर्मवर एका स्त्रीचं प्रेत पडलं होतं. तोंडावर पांघरूण होतं त्यामुळे ती कोण हे दिसू शकलं नाही. पण जवळच एक हिरव्या चाफ्याचं फूल पडलेलं पाहिलं आणि मी धूम ठोकली. मालाड बाजारातून मालाड-कांदिवली रोडवर आलो. तिच्या माझ्या संभाषणातील दोरे-धागे जुळवीत मी बंगला नं. २च्या गेटमधून शिरून मागच्या बाजूला असलेल्या छोटेखानी बंगलीकडे वळलो. हॉलच्या उजव्या बाजूची कॉल-बेल दाबली. एका मध्यम वयाच्या स्त्रीनं दार उघडून प्रश्नार्थक मुद्रेनं माझ्याकडे बघितलं.

'त्या कुठं आहेत?' मी प्रश्न केला.

'त्या कोण?'

'हे बघा. मला त्यांचं नाव ठाऊक नाही. पण त्या अन् मी कित्येक दिवस एकाच डब्यातून लोकलचा प्रवास करीत असू. त्या रोज हिरव्या चाफ्याचं फूल डोक्यात खोवायच्या. आज मालाड स्टेशनवर एक स्त्री दुर्घटनेत मरण पावली अन् तिच्या मृतदेहाजवळ मला हिरव्या चाफ्याचं फूल दिसलं.'

त्या स्त्रीनं हुंकार दिला अन् मला बसण्याची खूण केली व खुर्चीतल्या खुर्चीत किंचित् चाळवा-चाळव करीत तिने मला विचारले.

'या घरचा पत्ता तुम्हांला कोणी दिला?'

'त्यांनीच!'

'त्यांनीच म्हणजे?'

'कसं सांगू? त्या नेहमी केशरी साडी नेसायच्या अन् हिरव्या चाफ्याचं फूल डोक्यात असायचं.'

'नाव नाही विचारलं तुम्ही तिला?'

'विचारलं. पण....... पण त्यांनी टाळाटाळ केली.'

'हे पाहा. तुम्ही माझ्या धाकट्या बहिणीविषयी बोलत असाल तर — तिचा १५ जून १९५१ रोजी विरार लोकलमध्ये प्रथम वर्गाच्या डब्यात खून झाला.' मी

त्या स्त्रीच्या चेहऱ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहतच राहिलो व तोंडातून नकळत 'चक्-चक्' शब्द उमटला.

'अस्सं! खून दागिन्यासाठी झाला का ?'

'नाही. सारे दागिने अंगावर जसेच्या तसेच होते.'

'मग?'

'जाऊ द्या ते आता.'

इतक्यात माझ्या पाठीमागे असलेल्या दारात कुणाचा तरी भास झाला.

त्या स्त्रीनं त्या दिशेनं बघितलं अन् ती मोठ्यानं किंचाळली. मी मागे वळून पाहिलं तर एक पाठमोरी स्त्री त्या दारातून बाहेर पडत होती. केशरी साडी, डोक्यावर हिरव्या चाफ्याचं फूल! मी पटकन् उठलो आणि तिच्या दिशेला वळणार इतक्यात खुर्चीवरील स्त्री खाली पडण्याचा आवाज झाला. मी तिच्याजवळ गेलो. चमच्यानं तिची दातखिळी काढून तोंडात थोडं पाणी चमच्या-चमच्यानं टाकलं. तिनं एकदा डोळे उघडून माझेकडे बघितलं — किती निस्तेज डोळे — अन् पुन्हा डोळे बंद केले. मी तिला उचलून दिवाणावर ठेवलं. तिच्या अंगावर तिथलीच एक चादर टाकली आणि घरचा रस्ता धरला.

अगदी सडकेवर येईपर्यंत मला कुणीच भेटलं नाही. पण सडकेच्या काठावर एक इसम चिलीम पीत बसला होता. त्याच्या एकंदर रंगरूपावरून तो माळी असावा असं वाटलं. अंधार चांगलाच पडला होता अन् त्या इसमाच्या चिलमीतून जाळ निघाला नसता तर त्याच्या अस्तित्वाची मला कल्पनाही आली नसती. त्याच्या जवळ जाऊन मी विचारलं, 'माळी बुवा, त्या पलीकडल्या छोट्या बंगल्याचं नाव काय?'

'भूत बंगला.'

माझ्या पायाखालची जमीन सरकल्याचा भास झाला. मनात विचार आला, 'ती मोठी बहीण तरी खरी की — की ...... तीदेखील ....... भूतच!'

# मेरी बारी

'मेरी बारी' हा शब्द प्रयोग ऐकला की मला कुसुमची आठवण येते.

अन् कुसुमची मूर्ती डोळ्या समोर आली, की मला आठवते पु.भा. भावे यांची 'वर्षाव' कादंबरीमधील कुसुम.

कुसुमची पहिली भेट झाली ती लोकलमध्ये. बोरीवली स्टेशनवर मी माझ्या नेहमीच्या डब्यात पाऊल टाकलं आणि माझ्या रोजच्या सीटकडे वळलो. माझ्या सीटवर कुसुम बसली होती. फार चाणाक्ष मुलगी असावी ती! मुलगी कसली? पस्तीशीच्या घरातील बाईच म्हणा ना! काळेभोर केस. सावळा रंग. डोळ्याला चष्मा. हनुवटी वाजवीपेक्षा किंचित् आखुड. एकदम 'स्मार्ट' चेहरा — पण त्यावर अकाली आलेले गांभीर्य! चटकन् डोळ्यांत भरत असे ती कुणाच्याही. तिचं स्टेशन आल्यावर जेव्हा ती उठून जायला लागली तेव्हा तिची उंची अन् बांधा पाहून तर मी क्षणभर दंगच झालो. पाच फूट पाच इंच तरी असावी. अन् सडपातळ पण भरीव बांधा.

वर मी म्हटलं आहे नं की फार चाणाक्ष मुलगी असावी ती, म्हणून? ते अशाकरता की मी जवळ आल्याबरोबर तिनं बाकावर ठेवलेली पुस्तकं चटकन् मांडीवर ठेवली आणि माझ्यासाठी बसायला जागा दिली. गाडीत फारशी गर्दी नव्हती. मला कुठंही बसता आलं असतं. पण माझ्या नजरेला नजर भिडताच तिनं ताडलं असावं की ती बसली होती ती माझी नेहमीची जागा असावी म्हणून. खरं होतं ते. तो डबा अन् ती सीट. गेल्या पंचवीस वर्षांपासून मी त्याच डब्यांत अन् त्याच सीटवर बसून माझ्या ऑफिसला जात असे.

आणि त्यानंतर पण विरारला ती बसायची. बोरीवलीला मी. तोच डबा, तीच लोकल, तीच सीट. बरेच दिवस कुणी कुणाशी बोलेना. मग एक दिवस मीच विचारलं —

— 'आप पंजाब से आई हैं?'

एखाद्या गुन्हेगाराला पोलिसानं हटकल्यावर दचकावं तसं तोंड दिसलं मला

तिचं. पण स्वत:चे मनोविकार शक्य तो सांभाळून धरीत तिनं उत्तर दिलं—

— 'जी ..... नहीं ...... मैं हरियाणा से आई हूँ।'

मुंबईच्या माणसाला मद्रासी अन् केरळ याच्यात जसा तात्त्विक फरक भासत नाही तसा मला पंजाब-हरियाणा यात फरक दिसला नाही.

ही मुलगी सलवार-कमीजमध्ये फार उठावदार दिसेल. मधूनच माझ्या डोक्यात घोळायचं. पण तिच्या बांधेसूद शरीराला चापून-चोपून नेसलेली साडी पण छानच दिसायची.

मला वाटायचं — महाराष्ट्रात ह्या मुलीचं लग्न केव्हाच उरकलं असतं. पण पंजाब-हरियाणामध्ये तिचा रंग आडवा आला असावा. पण तसंही म्हणता येण्यासारखं नव्हतं.

प्रेसचं कर्ज आणि घरचा आवाढव्य खर्च याची जवाबदारी होती तिच्यावर. जणू काही मागच्या जन्माची ऋणाइतदार.

बोलताना तिच्या ओठाच्या हालचालीत तिच्या मनातील नैराश्य डोकावल्याखेरीज राहात नसे. तिची काही ठराविक साच्याची वाक्यं मला एव्हाना पाठ झाली होती — 'ऐसा ही है, जी'...... 'खैर, ठीक ही है'...... 'देखिये.......क्या कहें?' मनातील कडवटपणा वाक्यांत उमटायचा आणि मग तसले भाव ओठाच्या कडांवर.

हिचं कुणावर प्रेम तर नव्हतं ना? किंवा कुणाचं हिच्यावर? पण, तोही वाद लवकर मिटला. तिच्या एक-दोन हिन्दी कादंबऱ्या, एक काव्य-संग्रह आणि एक लघुकथा संग्रह मला वाचायला मिळाला. त्यात असल्या प्रकारच्या शंकेला वाव मिळाला नव्हता. हं...... नाही म्हणायला एका लघुकथेत तिच्या उनाड भावाचं प्रतिबिंब पाहायला मिळालं. इतकंच.

मला वाटतं ती जात्याच निराशावादी पोर असावी. आयुष्यापासून आपण खूप खूप आशा करतो पण अनुभवांत ते सिनेमातलं आयुष्य सहसा येत नाही आणि मग आपोआप माणूस निराशावादी, माणूसघाणा, बनतो नं? तसला काहीसा प्रकार तिच्या बाबतीत झाला असावा. कुणास ठाऊक. घाण्याच्या बैलाप्रमाणे चालत जात

असलेल्या आयुष्याचा पण हा परिणाम असावा. कोणत्याही बाबतीत उल्हास दिसला नाही तिच्यात.

आणि मग एके दिवशी तिच्या उनाड भावाचं पण लग्न झालं. एका नर्सशी. जरा खुष दिसली ती त्या दिवशी.

—'चलो जी। मम्मी-डैडी की एक फिक्र कम हो गई।' एवढ्याच एका वाक्यात तिनं पत्रद्वारे आलेल्या त्या बातमीचं स्वागत केलं.

त्या नंतर मुन्नीच्या — छोट्या बहिणीच्या लग्नाला जातीनं ती हजर राहिली होती. त्या लग्नात तिनं तीन-चार हजाराची मदत पण केली होती. आणि हे लग्न आटोपून ती मिठाई घेऊन परत आली ती बऱ्याचशा खुशीत.

—'अब तो आपको बारी है।' मी हसत-हसत बोलून गेलो. ती खूपच मोठ्यानं हसली अन् म्हणाली, 'जी हाँ, अब मेरी भी बारी आएगी.'

ती पुन्हा एकदा दीर्घ सुट्टीवर जायला निघाली तेव्हा मी म्हटलं, 'हे मिठाई पॅकेट वगैरे चालणार नाहीत या वेळी. मी विरारला येऊन तुमच्या दोघांबरोबर बसून जेवणार आहे, अं.'

तिनं एक दीर्घ नि:श्वास घेतला...... 'मम्मी सिरीयस हैं। तार आया है। बुलाया है।'

ती परत आली ती आई वारल्याची बातमी घेऊनच.

आणि पुन्हा ते मुंबईचं जीवनचक्र सुरू झालं. तीच लोकल, तोच डबा, तीच सीट.

पण जीवनप्रवाह कधी पावसाळ्यांतील उन्मत्त ओढ्याप्रमाणे, कधी हरिद्वारच्या शांत गंगा-प्रवाहाप्रमाणे तर कधी कोरड्या ठणठणीत नाल्याप्रमाणे नसला तर ते जीवनच नाही.

एके दिवशी कुसुम — एक वृद्ध पुरुष (साठी ओलांडलेला) एक चाळिशीच्या घरांतील (अर्धी चाळिशी ओलांडली असावी) एक स्त्री — या दोघांमध्ये 'सॅण्डविच' अशी त्याच डब्यांत, अन् त्याच सीटवर दिसली.

मला पहातच उठून उभी राहिली. मला स्वत:ची सीट देऊ केली अन् आपले

वडील व नूतन मातोश्रीची ओळख करून देत हसली.

हसली कसली? तिच्या स्मितात तिरस्कार होता की नाइलाज हे कळणं कठीण होतं. ओठाच्या कडेला त्या दोन रेषा स्पष्ट उमटल्या. चष्म्यांतले डोळे किंचित् डाव्या बाजूला वळले. अगदी मला परिचित असं ते स्मित होतं.

'म्हणजे..... मागून-पुढून बाप-नवरा. लेकीची पाळी येतच नाही.' असलाच प्रकार झाला एकूण. मी विचार करीत राहिलो.

पुढे काही दिवसांनी मला स्पष्टीकरण मिळालं.

'मम्मी वारल्यानंतर घरांतलं काम अगदी 'ठप्प' झालं होतं. माझी मावशीच आहे ही दुसरी आई — चला बिचारीला वैधव्यात 'सहारा' मिळाला.'

तिच्या त्या वाक्यातील दोन शब्द बरेच दिवस माझ्या डोक्यात घोळत राहिले.

'ठप्प'. एकादं काम अडून पडावं अशा परिस्थितीतला पंजाबी-हरियाणीवी शब्द प्रयोग आहे 'ठप्प' म्हणजे.

आणि दुसरा शब्द 'सहारा'. मी म्हणालो, (मनातच अर्थात्) 'सहारा' म्हणजे 'सहारा वाळवंट' की काय? आणि कुणाचं — कुसुमचं, की तिच्या नूतन मम्मीचं, की दिवस मोजत असलेल्या डॅडीचं. पण तिकडल्या लोकांना आयुष्य खूप असतं म्हणतात. म्हणजे एकूण 'सहारा' कुसुमच्या जीवनाचा तर।

मग एक दिवस मी तिला पुन्हा विचारलं.

'आता तुझीच पाळी ना?'

'हां, जी — अब मेरी ही बारी है।' असं उत्तर तिनं अतिशय उत्साहानं दिलं. असला उत्साह, असले चेहऱ्यावरील भाव, मला प्रथम दृष्टिगोचर होत होते. मला फार फाऽऽर बरं वाटलं.

बिचारी कुसुम! हिचं आयुष्य भाव्यांच्या 'वर्षाव' मधील कुसुम प्रमाणे होऊ नये असं मला खूप खूप वाटायचं. आणि तसं काही होणार नाही याची खात्री होती मला. जणू काही तिची जन्मपत्रिकाच बघितली होती मी. पण तिच्या हातावरील 'लाईफ-लाईन' फार जोरदार होती, हं.

तो सोमवार असावा. हो सोमवारच होता. कारण सोमवार ते रविवार हा काळ

इतका दीर्घ भासला होता की तो सोमवारच होता हे मी कधीच विसरू शकणार नाही. त्या दिवशी तिनं मला एक कागदाचं चिठोरं दिलं. त्यावर तिच्या विरारच्या चाळीचा, खोलीचा पत्ता होता.

—'रविवारी सकाळी साडे-नऊ वाजता रिसेप्शनला यायचं, बरं का अंकलजी' — ती म्हणाली. 'अगदी नक्की हं. मला तुमच्याशिवाय इथं जवळचं असं कुणीच नाही.' अगदी तीनदा-तीनदा. 'जरूर आना' वगैरे-वगैरे अगत्याचा आग्रह.

—'पण रिसेप्शनला का ? लग्नाला का नाही?' मी विचारलं —'लग्न केव्हा लागणार?'

ती एकदम सिरियस झालेली दिसली. आपण उगीचच आगावू प्रश्न विचारला, असं वाटायला लागलं मला.

किंचित् गंभीर चेहरा करून ती म्हणाली, 'नको. लग्नाला नको, आपण रविवारी ९.१० च्या सुमारालाच या, प्लीज.'

सायंकाळी घरी गेल्यावर पत्नीला ही आनंदाची बातमी खूप तिखट-मीठ लावून सांगितली मी. तिचं म्हणणं पडलं, मी शनिवारी रात्री तिच्या लग्नालाच जावं. पत्नी बरोबर येत असल्यास मी लग्नाला जाईन अशी टूम मी काढली. बराच वाद-विवाद झाला. त्यात किंचित खवटपणा यायला लागला. अनोळखी ठिकाणी ती जायला तयार होईना.

शेवटी रविवारी मीच विरारला जायला निघालो. बायकोच्या अट्टाहासाला न जुमानता आठवडाभर वापरलेल्या कपड्यांनीच मी बाहेर पडलो. बाकी निघताना तिच्या वटारलेल्या डोळ्यांना न जुमानता प्रेझेंटसाठी तीन हिरव्या नोटा खिशात कोंबल्या.

विरार कधी येत ...म्नं झालं होतं. माझ्या मोठ्या मुलीच्या लग्नाच्या वेळी झाली होती अगदी तशी मानसिक परिस्थिती झाली होती माझी. 'लग्नाला हिसार' हून कोण-कोण आलं असावं. या अबोल मुलीनं नवरा कुठला अन् कोण गाठला असावा बरं ?' इत्यादी विचार चालू असताच विरार स्टेशन आलं एकदाचं.

एका चाळीसमोर बरीच मंडळी चकाट्या करीत उभी असल्यानं तिकडेच वळले माझे पाय, न कळत. गर्दीतून मार्ग काढीत मी १३ नंबरच्या खोलीकडे धाव ठोकली. आणि —

ती तसली गर्दी पाहून मला आलेला संशय खरा ठरला.

खोलीत पोलिसांनी गर्दी केली होती. कॉटवर कुसुम पडली होती. तिनं स्लिपिंग पील्स ची जादा मात्रा घेतल्यामुळे रात्रीच केव्हा तरी तिची पाळी आली होती 'मेरी बारी'. मी पुटपुटलो. 'कुसुम, तुझी पाळी यावी अन् ती अशी।'

मी तिथं दाखविलेल्या उत्सुकतेमुळे म्हणा किंवा काय असेल ते असो — पोस्ट मॉर्टेम, अंत्यविधि वगैरे प्रकारात मला जातीनं हजर राहावं लागलं.

आणि सायंकाळी पोलीस स्टेशनवर जावे लागले ते वेगळेच. भलत्याच प्रकरणात अडकलो होतो मी.

पोलिस स्टेशनवर फौजदार साहेबानं एक पांढरं पाकीट माझ्या हातात देत विचारलं, 'कोणाचं असावं हे?' वर 'अंकलजी' एवढंच लिहिलं होतं. मी 'माझंच' म्हणून जवळ जवळ ओढूनच घेतलं ते पाकीट. आत एक छोटंसं पत्र. त्यात मला झालेल्या मानसिक व शारीरिक कष्टाबद्दल तिनं माफी मागीतली होती. त्या पत्राच्या खाली एक 'बेयरर चेक' होता रु.३००/-चा. तो तिच्या अंत्यविधीसाठी होता. पत्राखाली एक टीप : 'आखिर आई ना अंकलजी मेरी भी बारी?'

मी तो लिफाफा फौजदार साहेबापुढे ठेवला. त्यांनी वरवर नजर मारून पुन्हा मला परत केला. पोलिसांनी आधीच उघडून वाचून पुन्हा बंद केला होता तो.

घरी परत आलो तो रात्रीचे दहा वाजून गेले होते. श्रीमतीजी (पत्नीसाठी थेट पंजाबी ढंगाचा शब्द कुसुमच्या बोलण्यांत वारंवार येत असं) नाराजच दिसल्या.

ते पत्र अन् चेक तिच्यापुढे टाकून मी बाथरूम गाठली.

# चोराच्या मनात चांदणं

त्यांना माझ्या भेटीची इतकी उत्कंठा असावी याचं मला फार-फार आश्चर्य वाटलं. 'घरात पाय की दारात पाय' अशा अवस्थेत ते ओरडून म्हणाले — 'भले शाबास ! अरे गृहस्था, किती शोध करायचा रे तुझा?'

त्यांचे हे उद्गार मानभावी खास नव्हते. त्यांच्यात मानभावीपणा नव्हताच मुळी. अगदी सरळ, साधा, भोळसट, अबोल हा गृहस्थ. शुद्ध आणि स्वच्छ मन! अगदी 'तिळाचं तेल आणि कापसाची वात' म्हणतात नं, तसं!

मानभावीपणा, छद्मीपणा आला होता तो आमच्या वाटेला. कदाचित् सहवासाचा परिणाम असू शकतो. 'आओजी, कुछ चाय-वाय?' 'अजी, आपकी ही पीते है, धन्यवाद —' असलं प्रासंगिक भाषण करण्याची मला बरीच सवय झाली होती. पण त्यांना नाही.

आम्ही दोघे ही 'पॅट'! पॅट'— म्हणजे पटौदी नव्हे हं! ते प्रभाकर अच्युत ताम्हणे आणि मी प्रभाकर अमृत तांबे. सर्व जण आम्हांला पॅटच म्हणायचे. ते 'सीनियर पॅट' आणि मी 'ज्युनियर पॅट.' आमच्या बायकादेखील आम्हांला याच नावानं संबोधायला लागल्या होत्या.

ताम्हण्यांच्या वरील उद्गारानं मी पेपरमध्ये खुपसलेलं डोकं काढलं आणि वर बघितलं. ताम्हणे?

हो ताम्हणेच!

पण इथं कसे? माझा पत्ता त्यांना कसा सापडला?

एका क्षणात हे अन् असले अनेक प्रश्न झरझर मनांत आले. त्यांना पाहून मी भान विसरलोच जणू.

'अग, हे बघ कोण आलं आहे? अग ताम्हणे आले आहेत ग!' मी ओरडतच होतो. 'ताम्हणे? आपल्या जबलपूरचे?' असं म्हणत पदराला तोंड पुसत ती हॉलमध्ये आली. अन् 'अग्ग बाई! खरंच की!'..... 'कधी आले? कुठून आलात? घर कसं सापडलं? अहो त्यांना बसायला तर सांगा'— असे एक नाही, एका मागे एक हजार प्रश्न व हुकूम करीतच सुटली ती.

अन् मग, 'थांबा हं, आधी चहा आणते' म्हणून धावतच स्वयंपाकघरात शिरली.

ताम्हण्यांचं सामान घरात आणून त्यांना व्यवस्थिशीर बसविल्यानंतर मीच 'काय योगायोग हा! पण काय हो, माझा पत्ता कसा सापडला?'

'अहो ती फार लांबलचक कथा आहे. आधी चहा पिऊ या.' असं म्हणत त्यांनी चहाचा कप हाती घेतला.

मग दोन्ही कुटुंबांच्या अहवालाची देवाण-घेवाण झाली.

सध्या ती मंडळी पुण्याला स्थाईक झाली होती. त्यांचा मोठा मुलगा प्रकाश डॉक्टर झाला होता. त्याहून धाकटी पुष्पा लग्न होऊन एका मुलाची आई झाली होती व धाकटी प्रेमा नुकतीच बी.ए.! नलूताई —ताम्हण्यांच्या पत्नी—आता बऱ्याच स्थूल झाल्या होत्या. इत्यादी माहिती त्यांनी आम्हांला दिली— व आमच्या दोन मुलींची झालेली लग्नं, मुलगा अरविंद आय.ए.एस. होऊन दिल्लीला, धाकटी मुलगी येथील मेडिकल कॉलेजमध्ये फायनल एम.बी.बी.एस. ला — इत्यादी माहिती आम्ही त्यांना पुरविली.

पण मला आश्चर्य वाटत होतं ते हे, की आमचा पत्ता त्यांना कसा मिळाला? हे एक, आणि दुसरं म्हणजे त्यांना पुण्याहून शिमल्याला येऊन आमची गाठ घेण्याचा पुळका कुठून आला?

दुसऱ्या दिवशी दोन्ही गोष्टींचा खुलासा ओघाओघानंच झाला. अन् कोडं उलगडायला सुरुवात ताम्हण्यांनीच केली.

'काय रे ? प्रसून काय?'

'प्रसून या टोपण नावानं मी माझ्या लघुकथा लिहीत असतो.'

'हो! पण प्रसून म्हणजे काय?'

'फूल' मी म्हटलं.

'ते ठाऊक आहे रे! 'फूल' म्हणजे फूल हे टोपणनांव पण तुला शोभतं म्हणा!' कधी नव्हे तो विनोद ताम्हण्यांनी केलेला होता. अन् मग आम्ही दोघेही मनसोक्त हसलो. हसताना ताम्हण्यांचे वाकडे-तिकडे खेबडे दात दिसले. तेच दात! 'ताम्हण्याचे दात सरळ असते तर ताम्हणे किती सुरेख दिसले असते. नाही!' जबलपूरला असताना माझ्या पत्नीनं हे एकदा सहज म्हटलं होतं— केवढा मूड ऑफ झाला होता माझा

त्या वेळी !

हसणं ओसरल्यानंतर मी खुलासा केला — ‘अहो. ‘प्र’ म्हणजे प्रभाकर.’ ‘अच्छा! अन् ‘सू’ म्हणजे सुमन ना? वहिनींचं नाव?’ ताम्हणे. मी होकारार्थी मान हालविली ‘पण ‘न’ काय?’

मी चटकन् ‘न’ म्हणजे ‘नलिनी’ म्हणून गेलो अन् माझं मलाच कसंसं झालं. त्यांच्या पत्नीचं नाव नलिनी होतं. ताम्हणे शान्त अन् निर्विकार दिसले.

आणि......

आणि त्याही वेळी ते शान्त अन् निर्विकारच दिसले होते.

आम्ही जबलपूरला असताना आमच्या ऑफिसचा रस्ता ताम्हण्यांच्या घरावरून होता. आमच्या घरावरून बाजारचा रस्ता होता. तेव्हा ऑफिस सुटलं की मी त्यांच्याकडे चहा-फराळ करूनच घरी परतायचा अन् बाजारला जाताना ‘चलता का ?’ म्हणून त्यांनी मला हाक मारायची. कधी एकटेच गेले तर परतताना ‘ही बघा वांगी काय सुरेख मिळाली आहेत. ही पावभर तुमच्यासाठी आणली आहेत’— असं त्यांचं असायचं.

शनिवार, बुधवार असला की मुलांची बस उशीरा असायची; पण त्यांची शाळा लवकर सुटायची म्हणून ताम्हणे आपल्या मुलांना आणायला त्यांच्या शाळेकडे वळायचे व मी सरळ त्यांच्या घरी. तिथं चहा-पाणी झाले की नलूताईंशी चौसरचे एक-दोन डाव व्हायचे. नलूताईंना चौसरचा जितका भाव तितकाच ताम्हण्यांना त्याचा तिटकारा. आमचा डाव चालला असता ते घरी आलेच तर त्यांचं डोकं कुठल्या ना कुठल्या पुस्तकात खुपसलेलं असायचं. ते मराठी मासिकच बहुधा वाचायचे. अन् त्यांत माझी एखादी लघुकथा असली की तीवर चर्चा करायचे. माझ्या लघुकथेत त्यांना माझ्या मनाचा अपरिपक्वपणा दिसायचा तर, ‘तुमचं राहू द्या. किती धाडसी कथा आहे हो, तांबे’ असा शेरा नलूताईंकडून यायचा.

माझ्या एका कथेची नायिका ‘नलूताई’ नाही हे मी शपथेवार सांगितलं तरी कुणाला खरं वाटण्यासारखं नव्हतं — माझ्या पत्नीला पण ते खरं वाटेना आणि ती गोष्ट वाचल्या नंतरच नलूताईंनी आपली वेश व केशभूषा बदलली की काय - त्या नायिकेप्रमाणे केली की काय? हे कोडं मला पण कधी सुटलं नव्हतं. पण एवढं मात्र खरं की ती नायिका नलूताई नव्हती. कारण ती गोष्ट मी नलूताईंची भेट होण्यापूर्वी

तीन-चार वर्ष आधी लिहिली होती. छापली मात्र नुकतीच होती.

ताम्हण्यांकडे माझं वाढतं जाणं माझ्या पत्नीलाच नव्हे तर ताम्हण्यांच्या शेजाऱ्यांना पण खुपत होतं. पण ताम्हण्यांना मात्र त्याचं काहीच वाटेना. माझी खात्री होती; परंतु तो भ्रमाचा भोपळाही एकदा फुटला. निदान मला तर असंच वाटतं. आमचा चौसरचा डाव अगदी रंगात आलेला होता. अन ताम्हणे 'ऐका, ऐका' म्हणत आमच्या जवळ एका खुर्चीवर येऊन बसले. 'काय मस्त गोष्ट आहे', असं म्हणून एका मासिकातील गोष्ट वाचू लागले. दोन मित्रांमध्ये बायकांची अदला-बदल कशी होते या वरती लघुकथा होती. मी व नलूताई श्वास रोखून ऐकत होतो. आमची आतल्या आत चाललेली खळबळ आम्हांलाच ठाऊक. उगीचच्या उगीच आम्ही दोघेही कावरे बावरे झालो. ताम्हण्यांच्या चेहऱ्यावर काय फरक झाला हे कळणं कठीण होतं. कारण त्यांच्या धीरगंभीर चेहऱ्यावर सहसा कसलाच फरक कधीच दिसला नाही मला. त्यांचा चेहरा सदा निर्विकारच वाटायचा.

गोष्ट संपली. मी घरी आलो. 'अहो ते मोठे पॅट आले होते मघा.' बायकोनं सलामी दिली.

आमचा खेळ चालू असताना, ताम्हणे बाजारात जाऊन आले होते.

'आपला टॉर्च घेऊन गेले', तिचं चालूच होतं. माझ्या मनाची झालेली चलबिचल तिच्या ध्यानात आली की नाही मला ठाऊक नाही. तिचा चेहरा निर्विकार होता. अगदी ताम्हण्याप्रमाणे. मला दोघांच्याही चेहऱ्याचा संताप आला. हा कसला चेहरा दगडासारखा? मनातले भाव चेहऱ्यावर उठू नये म्हणजे काय? निव्वळ पत्थरच नव्हे का? इत्यादी विचार आले आणि त्यामुळे मला गुदमरल्यागत झालं.

आणि त्या दिवसापासून माझं ताम्हण्यांकडे जाणं बंद झालं ते अगदी कायमचं.

आज 'प्रसून' मधील 'न' नलिनी आहे हे कळूनदेखील ताम्हणे अगदी शान्त व निर्विकार.

फार वेळ ताणणं बरं नव्हे असं वाटून की काय मी पुढे म्हणालो. 'अहो, नलिनी म्हणजे माझी धाकटी मुलगी. एम.बी.बी.एस. करते आहे ती?' आणि मग मी आमच्या घरात नलिनी हे नाव कसं आलं याचा खुलासा करीत पत्नीला नलिनीच्या वेळी स्वप्नात कमळं कशी दिसायची अन् नलिनी हे तिच्या आवडीचं नाव आहे इत्यादी कथा थोडक्यात सांगितली.

'प्रसून' टोपण नावानं प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या गोष्टी वाचून 'प्रसून' म्हणजे मीच—प्रभाकर अमृत तांबे—याबद्दल ताम्हणे आणि नलूताईंची खात्री झाली होती अन् मासिकाशी पत्रव्यवहार करून माझा पत्ता प्रेमानं त्यांना आणून दिला होता. आमचा अरविंद आय.ए.एस. झाल्याचं त्यांनी पेपरमध्ये वाचलं होतं आणि प्रेमाचा फोटो घेऊन पुढील योजनेसाठी — अरविंदाला जावई करण्याच्या हेतूनं —त्यांनी इथवर येण्याचा खटाटोप केला होता.

प्रेमाचा फोटो आम्हां पति-पत्नीला फार आवडला होता. अगदी नलूताईंसारखी होती ती दिसायला. अशी सून आपल्याला मिळावी असं माझ्या पत्नीला फार-फार वाटत होतं.

'मग बोला, करता का आपले पूर्व-संबंध कायमचे दृढ?' ताम्हणे बोलायची आणि आमची नलू कॉलेजमधून यायची एकच वेळ झाली.

'एका अटीवर' मी म्हणालो, 'दोन नलू एका घरांत चालवून घ्यायला तयार असाल तर.'

'अहो त्यांत काय मोठं ? आम्ही सुनेचं नाव बदलू.' ताम्हणे म्हणाले.

दोन्ही लग्नातील मंगलाष्टकं मीच केलेली होती व त्यांत प्र-सू-न शब्द काव्यातील पहिल्या तीन चरणांत मोठ्या खुबीनं गोविलेला होता.

दोन्ही लग्नातील सोहळ्यांत ताम्हण्यांच्या आणि माझ्या पत्नीच्या सरळ, भोळ्या आणि निष्पाप मनाची साक्ष पदोपदी पटली होती. नलूताईंच्या वागण्यांतील मोकळेपणा पूर्वी सारखाच होता!

'अदला-बदल' गोष्ट ऐकून झालेला माझ्या मनातील गोंधळ — माझ्याच पापी मनाचं प्रतिबिंब होतं ते. म्हणतात ना 'चोराच्या मनात चांदणं.'

# प्रतारणा

इतक्या लवकर आमच्या प्रेमाची काच तडकेल असं मला स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं.

लग्नाला नुकतीच दोन वर्ष झाली होती. स्वारीची बदली दिल्लीला झाली होती. घरांचा अभाव होता आणि मला त्या दोन वर्षांतील त्यांच्या सुटीचा काळ सोडला तर कधी सासरी तर कधी माहेरी राहण्याची पाळी आली होती. ते सुटीवर दोनदाच आले आणि आम्ही दोन्ही वेळा परगावी निघून गेलो. एकदा गोव्याला अन् दुसऱ्या वेळी पुण्याला. सुटीचे दिवस किती भर्‌कन उडून जायचे!

सुटी संपून ते परत दिल्लीला जायला निघाले की डोळ्यांत आलेलं पाणी लपविण्याचा त्यांचा विफल प्रयत्न पाहून आम्ही दोघंही खुद्‌कन हसायचो.

'मला कधी नेणार दिल्लीला?' या माझ्या प्रश्नावर ते चिंतामग्न व्हायचे. मग घराच्या अडचणी. दिल्लीची बस-सर्व्हिस आणि मुंबईची बस-सर्व्हिस यांची तुलना इत्यादी चालायचं. पण या वेळी मात्र त्यांनी निश्चयपूर्वक हमी भरली होती की काय होईल ते होवो, येत्या दोन महिन्यांच्या आत 'मी तुला दिल्लीला नेणारच.'

आणि ते तिथून गेले की मला आमच्या लग्नापूर्वीच्या गोष्टी आठवायच्या. त्यांचं ते आमच्याकडे रोज येणं, स्कूटरचा आवाज ऐकला की माझं गच्चीवर धावत जाऊन डोकावून पाहणं, अन् त्यांचा तो इशारा, 'संभाळ हं, इतकी वाकू नकोस. पडशील नाही तर!' स्कूटर स्टँडवर टेकवताना त्यांची नजर खाली असायची, 'मग मी गच्चीवर उभी आहे हे त्यांना कसं दिसलं' हे कोडं मी उकलत बसायची. बरेच दिवस मला ते उलगडलंच नाही आणि मग कळलं की स्वारीनं स्कूटरचा आरसा असा काही बसविला होता की स्टँडकडे नजर टाकताना आरशात डावीकडील गच्ची दिसायची. माझ्या वडिलांच्याच कचेरीतील एक अत्यंत हुषार होतकरू तरुण अधिकारी होते ते. कामानिमित्त आमच्याकडे त्यांचं नेहमीच येणं-जाणं असायचं. ओळखीचं रूपांतर प्रेमात व प्रेमाचं लग्न-बंधनात व्हायला फारसा वेळ लागला नाही.

निश्चयाप्रमाणे खरोखरच अगदी दोन महिने होत नाही तर त्यांची तार आली— 'ताबडतोब निघून ये. घर मिळालं.'

आणि मी एकदाची दिल्लीला पोहोचले. सुखी कुटुंबाच्या एका विशाल घरातील दोन खोल्या आणि स्वतंत्र 'टॉयलेट' एवढीच जागा मिळाली होती. पण 'मिया-बीबीला' ती पुरे होती. शेजारी घरमालक, त्यांची पत्नी, एक १४-१५ वर्षांचा मुलगा अन् १९-२० वर्षांची मुलगी. मला ते घर एकदम आवडलं अन् आमच्या संसाराला सुरुवात झाली.

कित्ती.....कित्ती....मजेत चालले होते दिवस!

आणि....

त्या रविवारी सकाळी मी जे बघितलं त्यावर प्रथम माझा विश्वासच बसेना. मी स्वप्नात तर नाही!

सकाळचे आठ वाजले होते. 'रमा, दुसरा चहा आण ना,' म्हणत माझी सोडवणूक झाली होती.

आणि... मी चहाचा ट्रे घेऊन शयनगृहात शिरते तो ते दृष्य!

एक तरुणी त्यांच्या पलंगावर वाकली होती. स्वारी पलंगावर पसरली होती. मी चहाचे तबक घेऊन तशीच परतले. अन् देवाच्या फोटोपुढे उभी राहून, ' देवा ! हे काय वाढून ठेवलंस रे माझ्यापुढे, ' असं म्हणत ढसाढसा रडले.

शेजारची रमीन्दर होती ती यात मला मुळीच संशय राहिला नव्हता, तिचे ते लांबसडक मोकळे केस, ती तपकिरी 'बेल-बॉटम', चुन्नी-विरहित रुंद खांदे. अशा अवतारात मी तिला खूपदा बघितलं होतं. दिसायला सुन्दर होती. तरणी बांड, सशक्त!

मी आरशात पाहिलं. माझ्यापेक्षा कितीतरी सुरेख अन् बांधेसूद होती ती.

अन् त्या प्रकारानंतर आमचा अबोला. त्यांनी पुष्कळदा विचारण्याचा प्रयत्न केला. पण मी काहीच उलगडा करेना अन् दाद देईना. माझं तुटक वागणं रमीन्दरच्या लक्षात आलं असावं. इतकंच नव्हे तर धरमिन्दरच्या पण लक्षात खास आलं असावं. धरमिन्दर आमच्याकडे मराठी शिकायला यायचा. तो मुंबईला शिकायला होता,

मामाकडे. मामा निवर्तले अन् तो यंदाच वडिलांकडे आला होता. मुंबईला त्याला मराठी घ्यावं लागलं म्हणून इथं पण त्यानं तिसरी भाषा म्हणून मराठीच घेतलं.

संध्याकाळी आपली पुस्तकं घेऊन तो हॉलमध्ये आला तशी मी झटक्यानं दुसऱ्या खोलीत शिरले. 'क्या हुआ भाभीजी? तबीयत नाराज है क्या?' म्हणत तो दारापर्यंत आलाच.

अन् एवढ्यात त्यांना एका केसच्या चौकशीसाठी शिमल्याला जावं लागलं, तब्बल तीन आठवडे तिथंच राहायचं होतं त्यांना.

मला पुन्हा विरहाचे दिवस प्राप्त झाले. पण या विरहात समाधान होते. एक आसुरी समाधान! मला बरं वाटलं.

बायकांची जात आतताई असते म्हणतात. खरं की खोटं कुणास ठाऊक, मला आतताईपणा सुचला खास. ते इथं नाहीत एवढ्यात काहीतरी उपाययोजना करायलाच हवी. पण काय करणार? रमीन्दरशी भांडण उकरून खरं-खोटं करण्याची माझी इच्छा नव्हती — हिम्मत नव्हती, म्हटलं तरी चालेल. बोलून-चालून मराठी बाई मी, अन् तशात परदेशात, एकटी!

'वंदना' मासिकाचा एक जुना अंक हाती आला. अन् मला एक कल्पना सुचली. त्यांत 'तुमच्या समस्या-आमच्या सूचना' अशा आशयाचं एक पान असायचं, झालं. ताबडतोब त्यांना माझी समस्या कळविली. पुढील अंकी त्यांच्या सूचना आल्या. त्या बरहुकूम वागण्याचा मी निश्चय केला आणि माझी रंगीत तालीम सुरू झाली.

तीन आठवडे! तीन आठवड्यांनंतर स्वारी घरी परतली. विरह त्यांना असह्य झाला होता. हे त्यांच्या प्रत्येक हालचालीतून कळण्यासारखं होतं. माझी तालीम संपून प्रत्यक्ष नाटकाला सुरुवात झाली होती. जणू काही-काहीच घडलं नाही. अशा अवसानात मी वागत होते. पण खोदखोदून विचारल्यानंतरही मी पूर्वीच्या अबोल्याविषयी थांग लागू दिला नव्हता.

'इश्श्या, कसला अबोला, काहीतरीच आपलं.....'

'वाजे पाऊल आपुले म्हणे मागे कोण आले.....'

अशा प्रकारच्या त्रोटक उत्तरं अन् म्हणींवर मी निभावून नेलें. जुनं विसरून

नव्यानं आनंदात राहायचा हा माझा प्रयत्न होता.

'पण एकदा चटक लागली की ती कायमचीच' म्हणतात! अगदी तस्संच झालं म्हणाना!

हो!

रविवारच होता तो. तेच दृश्य, तोच प्रकार, मी चहाचा ट्रे घेऊन आलेली, तीच रमीन्दर! तोच अवतार! ते मोकळे केस! अंगावर चुन्नी नाही!

पण या वेळी वाकलेली नसून पलंगावर पाठमोरी बसलेली. स्वारीच्या हातात काहीतरी कागद. मूर्ती उत्तान तडक पलंगावर पसरलेली.

माझ्यानं राहवेना. जवळच्याच एका स्टुलावर चहाचा ट्रे ठेवला अन् तावातावानं मी आत शिरले. काहीही होवो. आज सोक्षमोक्ष करायचाच. असं लाल हातानं दोघांनाही पुन्हा पकडता येईल की नाही कुणास ठाऊक!

मी सामोरी आले आणि माझं सारं अवसान ओसरलं.

समोर पलंगावर बसलेली व्यक्ती रमीन्दर नव्हती. धरमिन्दर होता तो!

धरमिन्दर सिंह! रमीन्दर कौर नव्हे!

रविवार होता ना आज. त्याचे धुतलेले लांब-लचक केस पाठीवर मोकळे सोडलेले होते.

खरंच माझी प्रतारणा झाली होती; पण अगदी वेगळ्या रूपानं!

## लेखक

सेवानिवृत्ती नंतर काय करावं याचा कधीच विचार न केल्यामुळे निवृत्तीनंतरची माझी गेली पाच वर्षं किती अडचणीची चालली आहेत म्हणून सांगू? पण करणार तरी काय होतो? क्लर्क म्हणून साठावर लागलो अन् अडीचशे रुपये पेन्शनवर सुभेदार म्हणून निवृत्त झालो. सुरुवातीला टंकलेखनाची कला अवगत होती. आता अनभ्यासे ती देखील सोडून गेली.

वास्तविक अडीचशे रुपयात मी, माझी पत्नी व एकुलती एक मुलगी हेमा यांचं दिल्लीसारख्या शहरात भागणं अगदी अशक्यच होतं म्हणा. दु:खांत सुख एवढंच की हेमा एम.ए. झाली होती व तिला पीएच.डी.साठी रीसर्च स्कॉलरशिप मिळत होती.

रिटायर झाल्यावर आपल्या नवऱ्याला प्रॉव्हिडंट फंड मिळणार, त्यांच्या विम्याचे पैसे मिळणार व मग आपण निदान एक-एक बांगडी व एक गळ्यांतली साखळी आपल्याला व हेमाला करू अशी माझ्याच फोल आश्वासनावर रंगविलेली माझ्या पत्नीची स्वप्नं भंग झाली — सोनं आवाक्याबाहेर महाग झालं.

'सोनं कधीच उतरणार नाही का हो?' तिनं नेहमी विचारावं.

मी काय उत्तर देणार? उलट ते उतरू नये अशीच देवापाशी मी प्रार्थना करीत असे. कारण मिळालेल्या पैशातून वीरनगरमध्ये एक लहान घर बांधायचं व त्यांत एक लहानसं किराण्याचं दुकान काढायचं स्वप्न मी पाहात होतो. पण घरालाच सर्व पैसा लागला अन् दुकान स्वप्न ठरलं.

'कुठं आणून सोडलं, बाई, कुणास ठाऊक. एक मराठी कुटुंबदेखील नाही जवळपास घटकाभर बोलायला.' ही माझ्या पत्नीची सुरुवातीची तक्रार सुदैवानं म्हणा अगर दुर्दैवानं म्हणा, लवकरच दूर झाली. अकोल्याचे देशपांडे अन् अमरावतीचे देशमुख तिथंच वस्तीला आले. अण्णा देशपांडे रिटायर्ड हेडमास्टर अन् अप्पा देशमुख रिटायर्ड ड्राफ्टस्‌मन. त्यांची घरं पण आमच्या झोपड्याहून मोठी होती. त्यांची पेन्शन आमच्या दीडपट आणि दोघांनाही कमावती मुलं. त्यांत अण्णा देशपांडे शिकवण्या करायचे अन् अप्पा देशमुख नकाशावर चांगला पैसा मिळवायचे.

आमची बाजू फक्त एकाच बाबतीत सरस होती अन् ती म्हणजे आमची हेमा.

फार हुषार, आणि मेहनती मुलगी असून शिष्यवृत्तीवरच तिचं शिक्षण झालेलं होतं. अन् आईचा रंग व बापाची चेहरेपट्टी घेतल्यामुळे (धन्य नशिबा! इथं तरी फासा उलटा पडला नाही) हजारांत उठून दिसायची. राहणं अत्यंत साधं. बोलणं सौम्य. देशपांडे-देशमुखानं हेवा करण्यासारखं एवढंच दान आम्हांला पडलं होत. अन् हे काय कमी होतं?

पण लवकरच 'नको बाई मराठी शेजार' असं म्हणण्याची आमच्या कुटुंबावर पाळी आली. देशपांडे काकू आपल्या वडिलांची शेती, भावाची वकिली यांचा बडेजाव सांगू लागल्या की जीव नकोसा व्हायचा. यांचं बोलणं संपत नाही तर.... ''आमच्या अप्पाला''.... हो, देशमुख काकू नवऱ्याला 'अप्पा' म्हणायच्या—'आमच्या अप्पाला आज किनई एका नकाशाला सहाशे रुपये मिळाले.....' याचं जे कौतुक करायच्या की ते ऐकता-ऐकता आमच्या बायकोचा जीव घुटमळायला लागायचा. मग दोघींच्या मुला-मुलींचं कौतुक चालायचं.

'तू का नाही आपल्या हेमाचं कौतुक सांगत त्यांना?' मी सहज एकदा तिला विचारलं.

'नको ग बाई, कौतुक केल्यानं मुलं डोक्यावर बसतात, अन् एखादे वेळी त्यांना मेल्या कावळ्याची नजर लागते,' तिनं चटकन उत्तर देऊन मला निरुत्तर केलं.

'अन् माझा लेख परवा-तुझ्या 'स्त्री' मासिकांत आला तो तरी दाखविला का त्या मंडळींना?' मी पुच्छा केली.

'अं हं—' ती.

'नाही तरी तुला माझं कौतुकच नाही.' — मी.

'अहो तुम्हांला माहीत आहे का? तुम्ही घरी बसून असता, नुसतं पांढऱ्याचं काळं करता अन् तुमचे ९९ टक्के लेख परत येतात अशी तुमची कुचेष्टा करतात ती मंडळी.' बायकोनं माझं कंबरडंच मोडलं. ही गोष्ट मला माहीत झाली होती. ती दोन्ही कुटुंबं आमच्याकडे फारशा गौरवानं पाहात नव्हती. ती आमच्याकडे यायची ती माहेरहून आलेल्या साड्या दाखवायलाच.

आणि याला म्हणतात योगायोग! तो शनिवार होता, ती दोन्ही कुटुंबं आमच्या इथं गप्पागोष्टी अन् चहा-फराळ करीत बसली होती. इतक्यात पोस्टमननं भली मोठी डाक आणून ओतली.

'अबब! काय आबा (म्हणजे आम्ही) इतकी पत्रं?' देशपांडे मास्तर उद्गारले.

'अहो त्यात परत आलेलं लिखाण असावं, '' देशमुखांनी टोमणा मारला.

अन् हाय रे दुर्दैवा ! खरंच ते अकरा लिफाफे 'साभार परत' आले होते.

'म्हणजे एक लेख ठेवून घेतला तर!' मी माझ्या मुलीकडे पाहात अभिमानानं उद्गारलो.

'दिसतं खरं,' हेमानं चटकन् उत्तर दिलं. आमची बायको असती तर 'तेही परत येईल' असंच म्हणाली असती; पण सुदैवानं ती आत होती.

पण कसलं काय? दुसऱ्या डाकेनं बारावं लिखाण परत आलं आणि ते ही 'रकीबों के सामने'—अर्थात् आमच्या सर्व हितचिंतकांसमोर!

यानंतर खरंच पोराबाळांत देखील माझ्या लेखनकलेची टिंगल होऊ लागली.

'दिवसा काय करता, आबा?' कोणी विचारलं की 'अं! माझं आपलं लेखनकार्य चालू असतं.' हे माझं नेहमीचं उत्तर देण्याचा मला आता संकोच वाटू लागला.

'काही करीत जा, आबा. बसून कसं चालेल,' माझे दोन्ही हितचिंतक मला नेहमी सल्ला द्यायचे. पण मी काय करणार? काही करण्यासारखं मला दिसेनाच. जन्मभर कारकुनी केलेल्या माणसाची बुद्धी कशी बोथट होते याची मला वेळोवेळी जाणीव होऊ लागली. माझ्या सगळ्या आशा-आकांक्षा आता हेमावर केंद्रित होत्या. आणखी एका वर्षाचा प्रश्न आहे. ती पीएच.डी. होणार अन् मग... विश्वविद्यालयात असिस्टंट प्रोफेसर! देशपांडे-देशमुखांची सगळी मिळकत एकत्र केली तरी तिच्या वेतनाची बरोबरी करू शकणार नाही!

देशमुखांना आमची हेमा आवडायची; पण त्यांचा मुलगा साधा डिप्लोमा होल्डर होता. अन् हवं तितकं सोनं माझ्याजवळ नव्हतं. असा दुहेरी पेच होता.

दिवसांमागून दिवस चालले होते. कर्जावर कर्ज चढत चाललं होतं. आता माझी सर्व आशा माझ्या कादंबरीवर होती —'उपेक्षित'—हेमाला आवडली होती. बायकोनं तिचं कौतुक केलं होतं आणि हजाराला गेली तरी मला चाललं असतं. पण हेमा हक्क विकायला तयार नव्हती.

आणि तीही एक दिवस 'साभार' परत आली. मी तर अंथरूणच धरलं. हिशेब केला तर हेमा नोकरीला लागेपर्यंत एकूण देणं ५-६ हजारावर जाण्याचा संभव दिसत होता.

'म्हणजे घर गहाण पडणार का?' बायकोनं अत्यंत उदास मनानं पृच्छा केली.

'पाहूया देवाच्या मनात काय आहे ते. जे असेल तेच होईल.' मी जड अंत:करणानं उत्तरलो.

आता मला खरोखरच देव आठवू लागले होते.

मी खंगत चाललो होता, त्याचा परिणाम बायकोवर व हेमावर होत असलेला दिसत होता. मी उसनंच अवसान आणावं. पण हे नाटकदेखील फार दिवस चालू शकले नाही.

आता पोस्टमनची भीती वाटायला लागली होती. हेमाला पुढील महिन्यांत शंभर रुपयाची आवश्यकता होती. माझ्या ५-६ गोष्टी निरनिराळ्या मासिकांकडे पाठविल्या होत्या. २-३ जरी छापून आल्या तरी काम भागण्यासारखं होतं.

आणि एका सोमवारी पुन्हा पोस्टमननं डाक ओतली. साऱ्या कथा 'साभार परत' आल्या होत्या. आलेल्या डाकेत एक पत्र होतं — माझ्या चुलत भावाचं. त्याला अल्सर झाला होता व इलाजासाठी शंभर रुपयांची मागणी केली होती. दुसरं पत्र रीडर्स डायजेस्ट — वर्गणी पाठवा! तिसरं पत्र 'स्त्री' मासिक! 'पुढील महिन्याचा अंक व्ही.पी. नं पाठवीत आहे. कृपया स्वीकार करावा.'

'आबा, पाठवा नं बिचाऱ्या मोहन काकाला शंभर रुपये,' हेमाचे शब्द ऐकून मी शून्य दृष्टीनं तिच्याकडे पाहिलं. माझ्या डोळ्यांतील नैराश्य तिच्या ध्यानात आले असावे. तिनं आईकडे पाहिले. आईनं नजर फिरविली.

'अन् हे पहा! पुढील महिन्यापासून मासिक बंद.' मी पत्नीला सांगितलं. 'आणि हेमा! तुझे डायजेस्ट देखील बंद!'' मी शक्य तितक्या हलक्या आवाजात हेमाला सांगितलं. हेमाला खडसावून सांगणं मला कधीच जमलं नाही.

'अन्, आबा, हें पार्सल नाही उघडलं अजून?'

'अग, ते तुझं अमेरिकन रीसर्च सेंटरचं बाड दिसतं आहे.'

हेमानं मला चाकू आणून दिला. मी पार्सल उघडलं. एक पुस्तक उचलून चाळलं — विरंगुळा म्हणून!

पुस्तकाचं नाव — द डिस्कार्डेड

लेखक - अ. वि. कुलकर्णी

मला कसलाच बोध होईना. माय-लेकी तोंडाला पदर लावून हसत होत्या.

हेमानं पार्सलमधला लिफाफा केव्हाच काढून वाचला होता. तो माझ्या हातात देत दोघी माझ्या चेहऱ्यावर दिसणारे भाव न्याहाळण्यात मग्न होत्या.

माझ्या 'उपेक्षित' कादंबरीचं हेमानं इंग्रजी भाषांतर करून अमेरिकेतील एका प्रकाशकाला पाठविलं होतं. त्यासाठी तिला पंधरा हजार डॉलर्सचं बक्षीस मिळालं होतं. सोबत, आलेला चेक हातात धरून माझी पत्नी 'कशी जिरली' या भावानं माझ्याकडे पाहात होती.

यापूर्वीच आलेल्या एका पत्रामुळे माय-लेकींना पार्सल व पुस्तकाविषयी कळलं होतं, मला चकित करण्याचा त्यांचा कट साध्य झाला होता.

पण.... या पुढील पेचप्रसंग सुटण्यासारखा नाही—हेमाला पांढरी स्टँडर्ड गाडी हवी आहे, तर तिच्या आईला काळी फियाट आणि मला—घरावर दुसरा मजला!

लेखक

# पातिव्रत्य

तो उज्जैनहून आला होता अन् मी बुलढाण्याहून. आम्हा दोघांची भेट नागपूरच्या 'भरती दप्तरात' झाली होती. ३० जून १९४२ ची सकाळ.

आम्ही दोघंही भरती झालो. हवालदार क्लर्क म्हणून. पण तो ए.एस.सी. त गेला अन् मी ए.ओ.सी.त. दोघांना लाहोरचं वॉरंट मिळालं आणि ग्रॅण्ट-ट्रंकच्या इंटरक्लासमध्ये दोघांचाही एकाच डब्यात एकमेकांसमोरील बाकावर प्रवास सुरू झाला. इंटरमध्ये प्रवास करण्याचा आमचा दोघांचाही पहिलाच प्रसंग. दोघांच्या खिशांत तीस-तीस रुपये प्रवास खर्च. प्रवास मजेत झाला. पण तो 'होम-सिक' दिसला. त्याचं लग्न नुकतच सहा महिन्यांपूर्वी झालं होतं. परिस्थितीला तोंड देण्यासाठी, त्या बेकारीच्या दिवसांत सैन्यांत भरती झाल्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतं. त्याचं नाव मोहन. काळा-सावळा, ठेंगूतच जमा, पण नाकी डोळी नीटस.

माझं नाव आनंद. उंची पाच फूट आठ इंच, रंग गव्हाळ, शरीरयष्टी कमावलेली, वृत्ती खेळाडू व चैनी, अविवाहित. लढाईची मौज पाहण्यासाठी भरती झालेला.

दोघांची विचारधारा बरीच भिन्न होती. तो होता महत्त्वाकांक्षी, मेहनती, अभ्यासू व जिज्ञासू. मी खुशाल चेंडू, मोक्याचा लाभ उचलणारा, अभ्यासाचा कंटाळा, शेर-शायरी व गाणे-बजावण्याची आवड पुरविण्यासाठी कुठलंही धाडस करणारा.

वास्तविक एकमेकांविषयी फारसा जिव्हाळा तर राहूच द्या, साधी मैत्री होण्याइतकं देखील कुठल्याही बाबतीत आमच्यात साम्य शोधून सापडेना.

पण इतकं असूनही ट्रेनिंगच्या काळात आम्ही सुटीच्या दिवशी एकमेकांना हटकून भेटत असू. एका शनिवारी त्यानं आऊटपास काढून आमच्याकडे यावं तर दुसऱ्या शनिवारी मी त्याच्याकडे.

मग आम्ही दोघं कॅम्पमधील एका खालसा हॉटेलामध्ये 'संत्र्याचा अध्धा' व मटण प्लेट मागवून गप्पांना सुरुवात करीत असू. मद्याचा पहिला घोट घेताना त्याची काय अवस्था झाली होती, अन् मीटचा पहिला घास तर काढूनच टाकला त्यानं

तोंडातून. पण माझ्या सहवासात रश्शापासून सुरुवात करून 'बोटी' वर यायला त्याला फारसा वेळ लागला नाही.

तीन महिन्यांचं ट्रेनिंग संपलं अन् आमची पांगापांग झाली. मी 'बर्मा फ्रंट' वर गेलो. आणि तो, मला वाटतं, 'मिडल ईस्ट'ला गेला.

त्यानंतर आमची भेट झाली ती १६ डिसेंबर १९४६ रोजी नार्दर्न कमांड हेडक्वार्टर मध्ये. तो सुभेदार झाला होता आणि मी मेजर. पुढे लवकरच मी सुटीवर जायला निघालो अन् त्याला ते कळलं. एके दिवशी सायंकाळी मी नुकत्याच आणलेल्या 'जॉनी वॉकर'चं झाकण उघडलं अन् दारात त्यानं येऊन खट्कन् सलाम केला.

'अरे हे बघ मोहन, हे सगळं ऑफिसमध्ये किंवा परेड ग्राऊंडवर बरं का? आणि ते 'सर'—बिर मला नको आहे तुझ्याकडून.'

'असं कसं होईल, सर. आपल्यात आता अंतर पडलं आहे!'

मला त्याचे शब्द वाजवीपेक्षा जास्त लाघवी वाटले. लाहोरला असताना आम्ही एखाद्या विषयावर बरेच हमरी-तुमरीवर येत असू.

'सर, आपण सुटीवर निघालात असं ऐकलं.'

'हो.'

'कधी निघणार ?'

'येत्या रविवारी.'

'मग माझ्यावर एक उपकार करू शकाल का ?'

मी प्रश्नार्थक मुद्रेनं नुसतेच त्याच्या कडे बघितलं.

'सर, मला इथं क्वार्टर ॲलॉट झालं आहे; पण सुट्टी मिळण्याची शक्यता नाही. आपण नागपूरला जाणार असाल तर येताना माझ्या कुटुंबाला बरोबर आणू शकाल का ? प्लीज सर, फार उपकार होतील. आपण २० दिवसांतच परतणार असं ऐकलं आहे. हा माझ्या सासरचा पत्ता.' तो बोलतच गेला आणि बोलता-बोलता धरमपेठमध्ये राहात असलेल्या त्याच्या सासऱ्याचा पत्ता असलेला कागद त्यानं माझ्या पुढे ठेवला. मला ही कामगिरी कशीशीच वाटली.

काहीतरी अडचण आणावी या उद्देशानं मी त्याला वॉरंट कोणत्या क्लासचं

याची विचारपूस केली. कारण माझं रेल्वे वॉरंट पहिल्या क्लासचं, त्याचं कन्सेशन वाऊचर थर्डचं असेल तर त्याचा हेतू हाणून पाडायला ही अडचण पुरेशी वाटली मला. पण तो देखील फर्स्ट क्लासचं कन्सेशन घेणार होता.

मी विचार करीत राहिलो. दुसरा 'पेग' घशात ओतल्यावर बुद्धी जरा तरारली. मी भावी राष्ट्रीय संकटाची देशाच्या विभाजनाची गोष्ट काढली. पण तो कशालाच दाद देईना आणि खरं आहे. —सोळा महिन्यांपूर्वी तो सुट्टीवर गेला होता.

मी त्याच्या परिस्थितीचा विचार करून त्याला होकार दिला.

नागपूरला गेल्यावर प्रथम त्याच्या सासऱ्यानं यांत आडकाठ्या आणल्या. मला हायसं वाटलं. भलतीच जबाबदारी घेणं माझ्या जिवावर आलं होतं. त्यांत उत्तरेकडील वातावरण फार तंग होतं. मी त्याच्या श्वशुराला तिकडलं चित्र शक्य तितकं रंगवून सांगितलं. त्यांना माझं म्हणणं पटलं. पण मोहनचं बायकोला आलेलं पत्र आपलं काम बजावून गेलं — 'या वेळी तू न आल्यास यापुढे मला तू घरात नको. तुझ्या वडिलांच्या अडचणी जन्मभरच चालणार इत्यादी.'

सौ. मालती मोहन जोशी यांचा प्रवास आमच्या बरोबर सुरू झाला. तीच ग्रॅण्ट-ट्रंक एक्स्प्रेस. पण या वेळी मोहनऐवजी मालती व इंटरऐवजी प्रथम श्रेणी.

ती रस्त्यानं काहीच खाईना. तिची विचारपूस करता करता माझ्या नाकी नऊ आले. रावळपिंडी केव्हा येते अन् ज्याची वस्तू त्याला केव्हा देतो असं मला झालं. शेवटी दिल्ली आली. तेथे समजले की पुढील रहदारी कंट्रोल करण्यात आली आहे. मिल्ट्री स्पेशल ट्रेन मध्येच मिल्ट्रीचे लोक पाठविले जातील.

आता आली की नाही पंचाईत? अन् एवढ्यासाठीच मला ही जोखीम नको होती. कारण मी तिला घेऊन माझ्या 'मेस' मध्ये जाऊ शकत नव्हतो. शेवटी स्टेशनजवळील ग्रीन हॉटेलमध्ये दोन खोल्या घेऊन आम्ही राहिलो. रोज स्टेशनवर आर.टी.ओ. कडे जाऊन गाड्यांची चौकशी करण्या पलीकडे काहीच काम नव्हतं.

मालतीची अवस्था फारच केविलवाणी झाली होती. तिची मला दया येऊ लागली. शेवटी विरंगुळा म्हणून तिला टॅक्सीनं दिल्ली दाखवायला नेऊ लागलो. पुढे सिनेमाचा पण कार्यक्रम झाला. आणि एके रात्री तिच्या खोलीतून रडण्याचा आवाज

आल्यानं जाग आली. दोघांच्या खोलीत एक दार होतं. त्याला माझ्या बाजूनं कडी लागली होती; पण तिच्याकडून नव्हती. मी आत जाऊन विचारपूस केली. तिचं डोकं भयंकर दुखत होतं. छातीत कळा येत होत्या. वेदना असह्य होत होत्या. एवढ्या रात्री डॉक्टर मिळण्याची किंवा कुठलाही औषधोपचार करण्याची शक्यता नव्हती. माझ्या जवळ ऍस्प्रो होतं. पण ते तिनं नाकारलं. तिला त्याची ॲलर्जी होती. बाम लावून त्यावर मफलर गुंडाळून कशीबशी वेळ निभावून नेली. दुसऱ्या दिवशी डॉक्टरकडे नेलं व औषधं आणली.

पण रात्री बारानंतर तिचं दुखणं पुन्हा सुरू झालं. हळूहळू मला नर्सच्या कामाची सवयच लागली व लवकरच त्याची गोडी वाटू लागली. झोपताना 'देवा, आजदेखील हिचं डोकं दुखू दे'. अशी प्रार्थना करूनच मी झोपू लागलो.

खरं म्हणजे तशी प्रार्थना करण्याची काहीच आवश्यकता नव्हती. डोकं रोजच दुखायचं. तिला त्यावर इलाज माहीत होता. मलाही आतापर्यंत कल्पना येऊन चुकली होती; पण मी तो प्रसंग टाळू पाहत होतो.

पण म्हणतात ना 'बकरे की मां कब तक खैर मनाएगी' शेवटी महाभारतातील नाजुक प्रसंगाचं स्वत:ला पाठबळ देऊन त्या प्रसंगाला तोंड दिलंच.

आणि इलाज कधीच संपू नये असं वाटू लागलं.

आमचा पत्ता आम्ही मोहनला दिला होता. त्यावर त्याची तार आली — 'इकडे येऊ नये. मीच येत आहे.' मोहन लवकर येऊ नये असंच आम्हां दोघांना वाटू लागलं. पण तो आला.... माझे फार-फार आभार मानून मालतीला घेऊन गेला.

या प्रसंगाला बरीच वर्षं लोटली. त्या दरम्यान माझं लग्न झालं. पहिल्याच रात्री पत्नीला सर्व इतिहास सांगून हृदय मोकळं करून राजा-राणीचा संसार सुरू झाला.

एकदा सेवानिवृत्तीनंतर कंपनीच्या कामासाठी उज्जैनला गेलो....तर माधवनगरमध्ये कोण दिसावा? मोहन!

हो. तोच!

ऑनररी कॅप्टन म्हणून निवृत्त झाला होता. अगदी हट्टाला पेटून त्यानं आम्हांला घरी नेलं. माझ्या पत्नीला मालतीला पाहण्याची इच्छा होती.

मोहननं सेवानिवृत्तीनंतर एक छोटंसं दुमदार घर बांधलं होतं. घराचं नाव विचित्रच वाटलं; मी मोहनला विचारलं.

'हो, सर. मालतीच्या पुण्यप्रतापानं मला स्वत:चं घर उभारता आलं म्हणून घराचं नाव मी 'पातिव्रत्य' ठेवलं आहे.'

मी व माझी पत्नी यांच्यात झालेला इषारा मोहनला दिसू नये याची आम्ही काळजी घेतली होती की नव्हती — आठवत नाही.

# त्या दोन रात्री

डिसेंबरची पंधरा तारीख उजाडली होती. छे! उजाडली नव्हे, मावळत होती. आमची जीप कुल्लु-मंडी रस्त्यावर भरधाव चालली होती. डावीकडे खडक ओलांडून धावत असलेल्या व्यास नदीची खळखळ, वाऱ्यानं हलत-डोलत असणाऱ्या 'चीड' झाडांची सळसळ, आणि, आमच्या मनात 'मणिकरण'च्या गरम झऱ्यांबद्दलचं कुतूहल. थंडी मी म्हणत होती. माझ्या बाजूचं 'साइड स्क्रीन' उघडं असल्यामुळे जीपमध्ये थंडगार वारा शिरत होता. सर्वजण शक्यतो एकमेकांना चिकटून बसले होते. 'औट'चा डाक-बंगला केव्हा येतो असं झालं होतं प्रत्येकाला आणि..... एकाएकी जीपचं मागचं टायर फुटलं. त्या वेळी 'औट' तीन-चार मैल राहिलं असावं.

आमच्याबरोबर त्या भागातील पंचायत सेक्रेटरी होता. त्यानं आम्हांला धीर देत तेथून अर्धा मैल असलेल्या एका घरात नेलं. जेवणं झाली, व झोपण्याची व्यवस्था पण तिथंच करण्यात आली. खरं म्हणजे ते घर त्या सेक्रेटरीचंच होतं. त्याचं नाव नारायण लाल. कुल्लु भागातील ब्राह्मण जातीचा होता तो. त्या सेक्रेटरीला दोन बायका होत्या. पहिलीपासून मूल-बाळ नसल्यानं तिनं आपली स्वतःची बहीणच सवत करून घेतली होती. हा छोटासा इतिहास मी माझ्या पत्नीला सांगितला तेव्हा तिची त्या 'छोटी'ला पाहण्याची उत्सुकता जागृत झाली. अन्....बायकांच्या युक्त्या बायकांनाच ठाऊक. खरोखरच ती 'छोटी' त्या खोलीत आली. तसं म्हटलं तर तिला पडदा वगैरे नव्हता. पण परक्यासमोर यायला ती कचरत असावी. अन् त्यात मी तिच्या पतीचा 'अफसर' होतो ना!

फार सुंदर तरुणी होती ती. असेल वीस-बावीसच्या घरात. तसं पाहिलं तर कुल्लुमनाली भागातील कामगार वर्गातील स्त्रियांच्या विशिष्ट कपड्यांमुळे तेथील त्या वर्गातील सुंदर-सुंदर स्त्रियादेखील सहसा मनात भरत नाहीत. कदाचित् त्या गोल टोपीमुळे असेल तसं. पण ही 'छोटी' मात्र फारच मोहक दिसत होती. थोडा वेळ पंचायत अधिकारी-बाई अन् सेक्रेटरीण-बाई बोलल्या अन् 'अच्छा, अब आप आराम कीजिए' असं म्हणत 'छोटी'नं तेथून पाय काढला.

दुसऱ्याच्या पलंगावर निजण्याची सवय नसली की उगाचच काही चावतं,

काही बोचतं. आमच्या सौभाग्यवतीचं पण अगदी तसंच झालं. तिची सारखी तक्रार सुरू होती. 'गडे, इथं काहीतरी चावतंय्' इत्यादी. तिला झोप केव्हा लागली, कुणास ठाऊक. मला मात्र बराच वेळ झोप लागली नाही.

अन् जेव्हा थोडा डोळा लागायला आला.... बापरे! माझ्या पायावरून एक थंडगार साप वळवळत गेल्यासारखं वाटलं मला. मी चटकन पाय पोटाजवळ ओढून घेतले. तेवढ्या थंडीत घामानं तरतरून गेलो. दिवा नव्हता. होती ती टिनीमिनी वाऱ्यानं विझली होती. टॉर्च उशाशीच होता. पण माझ्या नव्हे. पत्नीच्या. तिला हाक मारणार तितक्यात माझ्या कानाशी कुजबुज ऐकू आली. अगदी अस्पष्ट. काय समजायचं ते मी समजलो. पण झोपेचं सोंग घेऊन पडण्यापलीकडे मला काय करता येणं शक्य होते तसल्या स्थितीत?

असा किती वेळ गेला कुणास ठाउक. मिनिटा-मिनिटाला झोपेचं सोंग पुढे चालू ठेवणं कठिण होत गेलं. मी देवभक्त आहे. देवाचा धावा करत हूं की चूं न करता माझ्या गाढ झोपेचं सोंग चालूच ठेवलं. इतक्यात....

पायथ्याकडील खोलीत कसला तरी आवाज आला. मला उठवू पाहणारी व्यक्ती चाचपत-चाचपत त्या खोलीकडे जायला लागली. दरवाजा उघडला गेला. तेथे एक दिवा जळत होता. त्या मंद प्रकाशात मी डोळे फाडून पाहू लागलो. ती व्यक्ती त्या खोलीत शिरली. दरवाजा बंद झाला. मी सुटकेचा सुस्कारा सोडला. 'छोटी' होती ती. पण या वेळी तिच्या डोक्यावर ती गोल टोपी नव्हती.

आता झोप लागणं शक्यच नव्हतं. मन किती वेगानं चालतं याचा प्रत्येकाला अनुभव असतोच. डोळ्याचं पातं लवत नाही तर मी अनेक वर्षं मागे गेलो.

१५ डिसेंबरचीच रात्र ती. त्या वेळी सैन्यात नुकतंच सेकंड लेफ्टनंट म्हणून कमिशन मिळालं होतं. नागपूर-छिंदवाडा रोडवर माझी जीप भरधाव चालली होती. कमांडिंग ऑफिसरचा फोन आल्यामुळे मला नागपूरचे पुढील कार्यक्रम रद्द करून छिंदवाड्याला परत यावं लागलं होतं. त्या वेळी दुसऱ्या महायुद्धात भाग घेण्यासाठी सैन्याची 'सातवी तुकडी' छिंदवाड्याजवळ उभी करण्याचे काम जोरात चालले होते. तो आमचा प्रशिक्षणाचा आखाडा होता.

आणि .....'क्लच प्लेट' तुटली. अन् ती कुठे? छिंदवाड्याचा घाट संपून गाडी सरळ रस्त्यावर येते न येते तोच. रात्र अत्यंत काळीकुट्ट होती. थंडगार वारा थैमान

घालीत होता. अंगावर 'ऑलिव्ह ग्रीन' युनिफॉर्मशिवाय काही नाही. भूक लागलेली. पोटांत शब्दश: कावळे ओरडत होते. जीपमध्ये इकडे-तिकडे पाहिलं—व्हिस्कीची बाटली, वेफर्सचं पाकीट, बस्स! पाणी नाही, सोड्याची बाटली नाही. खाली उतरलो. दूरवर चौफेर नज़र टाकली. एक दिवा २-३ मैलांवर दृष्टीस पडला. रानटी श्वापदापासून संरक्षणासाठी जीपचं हॅण्डल घेतलं व त्या दिव्याकडे वाट सुरू केली. मधून-मधून 'नीट' घोट घेत व वेफरचा तुकडा चघळत.

ती झोपडी वाटली तितकी सडकेपासून दूर नव्हती. जेमतेम पंचवीस-तीस मिनिटांत ती गाठली. माझ्या बुटांचा, वाळलेल्या पानांवर येत असलेल्या 'थप्-थप्' आवाजा मुळे, झोपडीतील एक व्यक्ती कंदील घेऊन झोपडीच्या बाहेर आली. ती कुणी स्त्री असावी या पलीकडे मला फारसा बोध होऊ शकला नाही, त्या वेळी.

मी २०-२५ फूट अंतरावर असताच ती व्यक्ती जोरात बोलली, 'कौन? बाबा?' मग जरा गांभीर्याने, 'इतने अंधेरे में क्यों आए, बाबा? वहीं कहीं रह जाते।'

ती स्त्री बरीच तरुण असावी. आवाजावरून अन् आकारावरून अंदाज लावला. असल्या रात्रीच्या वेळी ती घाबरून जाऊ नये म्हणून मी बोललो, 'मैं बाबा नहीं हूँ. मैं एक मुसाफिर हूँ।'

झोपडीकडून कसलाच आवाज आला नाही. मात्र मी तिथं पोहोचल्यावर त्या स्त्रीनं हातातील कंदील वर करीत मला न्याहाळण्याचा प्रयत्न केला. माझ्या वेषानं ती बरीच घाबरलेली दिसली, व जवळ-जवळ ओरडलीच, 'आप कौन है? यहाँ क्यूँ आए है?'

मी शांतपणे माझा इतिहास थोडक्यात सांगितला व मला फार भूक लागली असल्याचं पण अगदी काकुळतीनं सांगितलं. तिनं लहानसा न कळत घेतलेला सुस्कारा मला जाणवल्याशिवाय राहिला नाही.

तिचा संकोच पाहून मी खुलासा केला. 'देखिए, डरने की कोई बात नहीं. मैं बाहर बैठकर ही खाऊंगा और रातभी बाहर ही गुजारूंगा। थोडीसी लकडियाँ हो तो दो। यहीं धूनी रमा लूंगा।' तिच्या घरांत लाकडं नव्हती. खाण्यासाठी पण काहीच नव्हतं. ती दिवसभर उपाशी होती व आपल्या वडिलांची वाट पाहत होती.

मी खिशांतील आगपेटी काढली व जवळपासचा पाचोळा आणि काड्या गोळा करू लागलो तशी ती म्हणाली, 'ठहरिए! अंधेरे में हात न डालिए। यहाँ बहुत जहरीले

सांप हैं।'

तिनं मला आत घेतलं. झोपडी ऊबदार होती. मी पाणी मागितलं. माठातून एक पेला पाणी भरून तिनं माझ्या पुढे ठेवले. काढू की नको अशा द्विधा मन:स्थितीत मी जॉनीवॉकरची बाटली काढली. वेफरचं पाकीट तिच्या पुढे केलं आणि आमचं डिनर सुरू झालं. थोड्याशा आग्रहानंतर तिनं पण थोडीशी घेतली. झोपडीत दुसरं कुणीच नव्हतं. तिला भीतीनं व मला संकोचामुळे झोप येणं शक्यच नव्हतं. अन् अंथरा-पांघरायला तरी दोन फाटक्या गोधड्यांशिवाय काय होतं तिथं ? खाली अंथरायला गवत अन् वर पांघरायला घाणेरडी गोधडी.

पेयाच्या अमलानं गुंगी यायला लागली. पण थंडी डोळा लागू देईना. एक-एक मिनिट निघता निघत नव्हता. किती वाजले असतील कुणास ठाऊक. गुंगीतच होतो मी थोडासा. अन् हळूहळू ऊब येत चालली. शेवटी निसर्गानं संस्कृती, शिक्षण, दर्जा या सर्वांवर मात केली. अशी ऊब मला जन्मात प्रथमच मिळाली होती. विचार करण्याचं भान नव्हतं, छे! वेळच नव्हता विचार करायला. अविचारात जिथं सुख मिळतं तिथं विचार करून गमावण्याच्या मन:स्थितीत मी नव्हतो, हेच खरं!

एका आंधळ्या भिकाऱ्याच्या झोपडीतील ती रात्र अन् कुल्लु-व्हॅलीतील ही दुसरी रात्र! एकीत निसर्गानं मात केली, तर दुसरीत सद्सद् विवेक बुद्धीचा विजय झाला.

# फुई

त्या रात्री आम्ही चंडीगढहून परत आलो तेव्हा रात्रीचे दहा वाजले असतील. घरच्या जीपचा प्रवास होता तरी जयंत, प्रतिभा, मी आम्ही तिघंही थकल्यासारखे दिसत होतो. शिमला ते चंडीगढ साडेतीन तासांच्या प्रवासात कुणी कुणाशी फारसे बोललो नाही. नाही म्हणायला सोलनला जयंतानं आणि मी 'ग्रीन रेस्त्रां' मध्ये "वॉर्मिंग-अप" साठी एक-एक रमचा पेग मारल्यावर जयंता जरासा उल्हसित दिसला.

रात्री अंथरुणावर किती तरी वेळ मी नुसता पडून होतो. वाटलं, जयंतला उठवावं आणि सारं विचारावं. पण त्याला आणि प्रतिभाला केव्हाच झोप लागली असावी.

बिचारी प्रतिभा! प्रतिभा माझी मामेबहीण. जुन्या मध्य प्रदेशात तिचे वडील अर्थात माझे मामा एका फार मोठ्या सरकारी पदावरून सेवानिवृत्त झाले होते. माझ्याच ओळखीमुळे जयंताचं आमच्याकडे - म्हणजे माझ्या मामांकडे येणं जाणं सुरू झालं होतं. जयंतात काय आकर्षणशक्ती होती कुणास ठाऊक, पण लवकरच प्रतिभा आणि तो एकमेकांच्या प्रेमपाशात सापडले होते आणि ३५ वर्षांपूर्वी मामा-मामींच्या इच्छेविरुद्ध त्यांचं लग्न होऊन ते आज चार मुला-मुलींचे आई-वडीलच नव्हे तर एका मुलीच्या मुलाचे आजा-आजी झाले होते.

नुसत्या बी.ए.झालेल्या जयंताला आपली मुलगी देण्याइतके मामा-मामी अव्यवहारी नव्हते. पण तिथंही जयंतचं व्यक्तिमत्त्व काम करून गेलं. अनिच्छेनं का होईना, मामा-मामींनी त्याला स्वीकारलं. जयंत हा खरोखरीच "रोलिंग स्टोन" होता. तरी अपवाद म्हणून का असेना त्यानं थोडा बहुत "मॉस" गोळा केला होता. मोठा मुलगा सैन्यात कॅप्टन. त्याच्या खालच्या दोन्ही मुलींची लग्नं झालेली. एकीचे यजमान इंजीनियर तर दुसरीचे डॉक्टर. स्वत: जयंतजवळ एक टुमदार जीप. दरमहा सैन्यातील पेन्शन व महाराष्ट्रात असलेल्या त्याच्या घराचं भाडं. आम्ही मात्र मॅट्रिक झाल्यावर रुपये सत्तर पासून सुरुवात करून एका खासगी शाळेतून बिन पेन्शन निवृत्त. स्वत:चं घर नाही. थोडी बहुत जमविलेली माया चार मुलींच्या लग्नात संपवून टाकलेली व आज नवराबायकोच्या उदरनिर्वाहासाठी विमा एजंटचा धंदा.

पुष्कळ वेळा मनात यायचं - खरा ''रोलिंग स्टोन'' कोण, मी की जयंत? पण माझ्याजवळ जयंतची धडाडी नव्हती याला मी मास्तर झालो हीच एक पुष्टी पुरेशी नाही का ? जयंत प्रथम बँकेत होता. तिथं भानगडी केल्या. लहानसा धंदा केला. त्यांत काही फारसं जमलं नाही. पण त्यानंतर मात्र हिटलरच्या कृपेचा भरपूर फायदा घेऊन आज त्याची फळं उपभोगीत आहे.

द्वितीय महायुद्धाच्या वेळी जयंत परत यायचा म्हणजे प्रत्येक वेळी काही नवीन वस्तू कोणत्या ना कोणत्या परदेशांतून तो आणायचा. ट्रान्झिस्टर, सिग्रेट-लायटर, लेदर बॅग्ज, किती-किती भारतात दुर्लभ वस्तू त्यानं परदेशातून आणल्या होत्या. बँकॉकहून आणलेला तो पाइप, सिगारेट केस, किती सुंदर आणि सुबक वस्तू होत्या त्या.

सैन्यातील सेवानिवृत्तीनंतर महाराष्ट्रापासून हजार-बाराशे किलोमीटर दूर असलेल्या शिमल्याला स्थाईक होण्यात देखील दूर-दृष्टीपेक्षा त्याची धडाडी कारणीभूत असावी. प्रतिभा म्हणते,''यांच्या गरम डोक्याला इथल्या थंड हवेचं अमृतांजन मिळतं.''

धाकटा मुलगा संजय चंडीगढच्या आर्किटेक्चर कॉलेजात होता. परवा त्याच्या खोलीवर गेलो असता तिथलं फर्निचर अन् एकूण थाट पाहता हादेखील वडिलांच्या पाऊलावर पाऊल टाकणार की काय असं मला वाटायला लागलं होतं. वडिलांच्या धडाडीचा बरासचा वारसा त्यानं उचलल्यासारखा वाटत होता. आणि त्याच्याशी बुद्धिबळ खेळणारी ती सयामी मुलगी! किती सुंदर होते तिचे डोळे!! ''मंगोलियन रेस''च्या डोळ्यांतील लुकलुकी त्यांत कुठेच दिसत नव्हती. किती शांत अन् टपोरे होते तिचे डोळे. नाकाच्या बसकेपणा मुळे व पीत वर्णामुळेच काय ती मंगोलियन वाटायची.

''संजयला जरा वरं नाही,'' अशा बायकी अक्षरांत आलेल्या पत्रावरून आम्ही त्या दिवशी चंडीगढला त्याला पाहायला गेलो होतो. एरवीपेक्षा खोली खूपच नीट-नेटकी, टापटीप, स्वच्छ दिसली. समोरील पलंगावर डोक्याला मफलर घातलेला संजय आणि त्याच्या समोर बसलेली 'फुई' बुद्धिबळाच्या खेळात इतकी मग्न होती की आम्ही खोलीत आल्याच देखील त्यांना कळलं नाही. संजयला विषमज्वराचा ताप आला होता. तो आता बरा होता पण घराबाहेर न पडण्याबद्दल डॉक्टरनं सक्त

ताकीद दिली होती. त्याचं हे शेवटलं वर्ष होतं आणि परीक्षा झाल्या बरोबर फुई आणि तो बँकॉकला जाणार होते व परत भारतात येऊन जॉइंट बिझनेस सुरू करणार होते.

मला स्वत:ला बुद्धिबळातलं काहीच कळत नव्हतं. प्रतिभा आतल्या खोलीत वॉश साठी गेली आणि जयंत त्या दोघांचा खेळ पाहण्यात मग्न झालेला दिसला.

मी व प्रतिभा चंडीगढच्या प्रसिद्ध रोझ गार्डन व सुखना लेकवरून फिरून आलो तेव्हा संजय झोपलेला होता. पण जयंत आणि फुई बुद्धिबळ खेळत होते. तो डाव अर्धवट ठेवूनच आम्ही जेवायला गेलो होतो. जेवण झाल्यावर अर्धवट राहिलेला डाव त्यांनी पुन्हा सुरू केला होता. फुई जयंतसारख्या पटाईत खेळाडूला देखील दाद देत नव्हती. शेवटी कंटाळून त्यांनी तोही डाव अपुराच सोडला. फुईला पोहोचविण्यास जयंत गाडी घेऊन गेला तो ३-४ तासांनी परत आला. गाडीची 'क्लच-प्लेट' खराब झाली होती म्हणे.

ऑक्टोबर महिन्यांतील शिमल्याची सकाळ फारच आल्हादकारक असते. सकाळी उठल्यावर मला खूपच ताजं-तवानं वाटू लागलं होतं. पण जयंत मात्र उदास आणि थकलेला वाटला. चहाच्या वेळी अॅस्प्रोच्या गोळ्या घेतल्या त्यावरून कालचं 'पेय' अजून लटकत असावं असं वाटलं. जेवताना जयंतचं लक्ष कुठे होतं कुणास ठाऊक पण तो नेहमीच्या मूडमध्ये नव्हता.

दुपारी प्रतिभा पेंटिंग क्लासला गेली असता मी जयंतच्या खोलीत प्रवेश केला. जयंत वर पाहात पडला होता. ''जयंत'' मी हाक मारली. त्या सरशी दचकून माझ्या बाजूला पाहात, 'ये. ये.' असं म्हणाला. पण त्या आमंत्रणात त्याचा नेहमीचा आवाज, गोडी खास नव्हती.

'जयंत, एक गोष्ट विचारू ?' -मी

'हं' ............. जयंत

'दुसरी सून पण परदेशातलीच करणार का?'

त्याच्या मोठ्या मुलानं इराणी मुलीशी लग्न केलं होतं.

'शक्य नाही, अनंता ते शक्य नाही,' असं म्हणत जयंत उठून बसला. बराच वेळ मान खाली घालून तो कसला तरी विचार करीत होता.

शेवटी उठून त्यानं गोदरेजचं कपाट उघडलं. कसलासा लिफाफा बाहेर काढला.

अन् त्यातून एका सयामी स्त्रीचा फोटो काढून मला दाखविला.

फोटो सुंदर होता. पण मला त्यावरून काही विशेष बोध न झाल्याने मी जयंताकडे पाहिलं. 'अनंता, फुई आणि संजय बहीण-भाऊ आहेत.' इतकं बोलून तो पुन्हा कपाटाकडे गेला. फोटो लॉकरमध्ये ठेवून परत माझ्याजवळ आला आणि माझे दोन्ही खांदे हलवून बोलू लागला.

'परवा तिच्या बुद्धिबळाच्या चालीवरून मला संशय यायला लागला होता. तिची आई अशीच धडाडीच्या चाली खेळायची. फुईला हॉस्टेलवर पोहोचवायला गेलो तेव्हा तिची खूप विचारपूस केली. त्यात हे कोडं उलगडलं.'

मी - 'पण तिचं आणि संजयचं लग्न ठरल्यासारखं आहे न?'

जयंत - 'मी तिला सर्वच सांगितलं आहे.'

थोडा वेळ थांबून जयंत म्हणाला, 'तिनं त्याच्याशी लग्न न करण्याचं मला वचन दिलं आहे.'

# कुमार के पापा

"मम्मी, देखो मेरे पापा जा रहे हैं।"

मी मागे वळून पाहिलं. त्या स्त्रीचा चेहरा पाहिल्यासारखा वाटला पण ओळखीचा नव्हता. मध्यम वयाची ही स्त्री आपल्या तीन-चार वर्षांच्या मुलाचा हात पकडून हळुहळू चालली होती. मी एकदा पुन्हा मागे वळून पाहिलं; तिनं तोंड वळवून घेतलं... का कोण जाणे?

त्या बालकाच्या शब्दांनी माझ्या विचारांची कडी तुटली. मनात असंख्य प्रश्न येऊन गेले - कोण आहे ही स्त्री? या मुलानं "मेरे पापा" कोणाला म्हटलं असेल? विचारांच्या ओघात केव्हा ऑफिसमध्ये पोहोचलो कळलंच नाही. चपराशाच्या बुटाच्या "खट्" आवाजानं मी चमकलो. त्याच्या सलामाचं उत्तर मानेनंच दिलं. तंद्री भंग झाली ..... आणि ऑफिसच्या कामात ती स्त्री व ते सुंदर बालक स्मृतिपटलांतून पार निघून गेले.

शिमल्यासारख्या ठिकाणी माझ्या एकाकी जीवनाचे फक्त दोन साथी होते, बस - माझी ब्रँडीची बाटली आणि माझा टायगर. घरी पोहोचतो न पोहोचतो तो टायगर अंगावर उड्या मारून मारून अगदी बेजार करायचा. आधी भुंकून स्वागत, मग अंगावर अगदी तोंडापर्यंत उड्या. जणू मुकाच घेणार आणि मग माझा हात तोंडात पकडून लोभ. अगदी वेडं करून टाकायचा. मग मी त्याच्या अंगावरून हात फिरवावा, त्याच्याशी दोन गोष्टी कराव्यात व एक बिस्किट द्यावं. बस्स! तो चुपचाप एका कोपऱ्यात जाऊन बसायचा. एकाकी जीवन 'परेड' प्रमाणे असतं - अगदी 'सेट', एकरस. माझा जीवनक्रमदेखील असाच होता - एकरस!

पुष्कळ वेळा मनात येऊन जावं, काय जीवन हे -

"सुबह होती है, शाम होती है
जिन्दगी यूं ही तमाम होती है।"

पण आता तक्रार करणं व्यर्थ होतं - आणि तक्रार करणार तरी कोणाकडे व का? पन्नाशी उलटलेल्या माझ्यासारख्या अविवाहित वृद्धाच्या जीवनात होतं तरी काय?

सहा वाजले आणि माझी ''प्रिया'' माझ्या समोर येऊन बसली. नि:शब्द वातावरण, तोच चिरपरिचित आवाज - बाटली उघडण्याचा, पेल्यात पेय ओतण्याचा; तोच ''घुप'' आवाज घोट घेण्याचा, ओठ बंद-उघड होण्याचा! सगळं एकरस, नव्हे, नीरस!!

दोन घोट घेतो न घेतो तोच सकाळची घटना अचानक मानसपटलावर आली - ''मम्मी, देखो, मेरे पापा जा रहे हैं।'' आवाजात गोडवा होता, एक बालिश माधुर्य!

आणि ती आई? चाळिशीत असावी. गोरा रंग, चेहऱ्यावर उदासी; पण त्या उदासीनतेच्या आतूनदेखील चेहऱ्यावर सौंदर्याची झाक.

ती स्त्री आणि ते पोर रात्रभर स्वप्नांत आले.

दुसरे दिवशी ऑफिसला जाताना त्याच रस्त्याहून गेलो. इकडे-तिकडे पाहिलं; जणु काही आज पुन्हा ते माय-लेक भेटतीलच - खुळं मन!

आणि.... एक-दोन पाऊलच पुढे गेलो असेन-नसेल तर तोच आवाज, ''मम्मी, वह देखो, मेरे पापा जा रहे हैं।'' तेच माधुर्य! मी वर पाहिलं. बाहेर उन्हात खुर्च्या टाकून चहा पीत होती आई आणि मुलगा रेलिंगला टेकून खाली पाहात होता.

''अरे.... हे घर? येथे तर मी आलो होतो. आणि ही मिसेस घोष का ? हा बहुधा तिचा एकुलता एक मुलगा कुमार तर?'' मी विचारात पडलो.

दोन वर्षांपूर्वीच तर मी येथे आलो होतो. तो दिवस आठवला की मन उदास होतं, कसंसंच वाटत. त्या रात्री श्री. घोष अचानक वारले होते आणि आम्ही तेथे गेलो होतो. ते हृदयविदारक दृश्य आज पण डोळ्यापुढे आलं की मन हादरून जातं. त्या दिवशी कमलजा घोषला पहिल्यांदा पाहिलं पण त्यानंतर तिला ओळखणं शक्य नव्हतं.

मला वाटतं, कमलजाला कित्येक वेळा मी माल रोड किंवा लोअर बाजारमध्ये पाहिलं असावं - खरं तर त्या आहेतच अशा की एकदा पाहिलं की पुन्हा वळून पाहावंसंच वाटेल. म्हणतात ना - ''खंडहर बता रहे हैं इमारत अजीम थी।'' त्यांचं ते उदास सौंदर्यदेखील तसंच होतं. पण हीच कमलजा घोष हे मात्र मी ओळखू शकलो नसतो रस्त्यावर.

मी वर पाहिलं न पाहिलं की त्यांनी त्या पोराला मागे ओढलं अन् त्याच्या

ओठांना चटकन कप लावला. जणु त्याला चुप करायलाच. दया आली मला त्या पोराची - का, कोण जाणे?

मग लक्षांत आलं - वडिलांच्या मृत्यूसमयी कुमार असेल दीड-दोन वर्षांचा. पित्याची आठवण धुरकट असेल त्याच्या स्मृतीत आणि येणाऱ्या-जाणाऱ्याला ''मेरे पापा'' म्हणत असावा. आई तेच जुनं-पुराणं उत्तर देत असेल- 'तुझे पापा किनई गेले आहेत कामाकरता बाहेर.'

तिसऱ्यांदा हेमराज डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये उभा असता मागून पुन्हा तोच स्वर, 'मम्मी, मेरे पापा.' मागे वळून पाहिले तो ती बाई त्या मुलाला जवळ-जवळ फरफटत-फरफटतच घेऊन जाताना दिसली.

आता मला कळून चुकलं होतं की मला पाहूनच हा पोरगा ''मेरे पापा'' म्हणतो. त्या रात्री मी झोपू शकलो नाही. राहून राहून गाय-द-मोपासांची लघुकथा ''सैमस् फादर'' आठवत होती. अन् पंचवीस वर्षांपूर्वीची ती घटना डोळ्यांपुढून सट्सट् निघून गेली.

द्वितीय महायुद्धाचे ते दिवस! मी व माझा एक मित्र बर्मा फ्रंटहून सुट्टीवर भारतात आलो. मित्राच्या व त्याच्या आईच्या आग्रहास्तव मी त्याच्याकडे दोन दिवस मुक्काम केला.

मित्राच्या घरी त्याची आई, पत्नी आणि एक काळी-सावळी परंतु अतिशय लोभस मुलगी बस इतकेच. त्या रात्री आम्ही पोहोचलो तर मुलगी झोपलेली होती. सकाळी झोप उघडली ते तिच्या मधुर शब्दांनी - ''आई, दोन-दोन काका आले?''

तेव्हा माझ्या मित्रानं पोरीला उचलून घेतले आणि काका कोण व बाबा कोण हे समजावून सांगितलं. चहा-पाणी झालं आणि त्या बालिकेनं बाबांचा हात पकडला, त्यांना बाहेर नेलं आणि आपल्या सर्व चिमुकल्या मैत्रिणींना बोलावून खड्या आवाजात सांगितलं, ''हे पाहा माझे बाबा!''

रोज संध्याकाळी सगळ्या मैत्रिणींचे बाबा घरी यायचे तेव्हा त्या त्यांच्या सायकलींना लटकायच्या, झोंबायच्या आणि मग आपल्या बाबांना. पण ह्या चिमुकल्या जिवाचे बाबा येतच नव्हते. ''आई, माझे बाबा का येत नाहीत?'' ती विचारायची आणि आज आपल्या बाबांना आलेलं पाहून तिचं मन आनन्दानं बहरलं. सैनिक जीवनातील तो प्रसंग पाहून आणि ते मिलन पाहून डोळ्यांत आनन्दाश्रु आले,

प्रेमाश्रू आले.

रात्रभर कधी मोपासांची गोष्ट तर कधी पंचवीस वर्षांपूर्वीची ती घटना डोळ्या समोर येत राहिली. कितीतरी वेळ कुमार आणि त्याची आई आठवत राहिली.... आणि न जाणे केव्हा डोळा लागला.

खरं म्हणजे ऑफिसपासून माझं घर लांब पडायचं. शिमल्यासारख्या ठिकाणी, जिथं आपले पायच आपलं वाहन आहे, तीन-साडेतीन मैल रोज जाणं-येणं आता उतरत्या वयात जाणवायला लागलं होतं. मनात कित्येकदा, की ऑफिस जवळच एखादं घर भाड्यानं घ्यावं; पण जमलं नाही.

त्या दिवशी कमलजा घोषच्या घराजवळून चाललो होतो. वाटलं, आज पण असेल का ते गोड पोर? पडेल का तो मधुर स्वर कानांवर? आशा-निराशा, शंका-कुशंकांच्या जाळ्या विणत मी चाललो होतो. आपली सगळी शक्ती एकवटून कानांत आणली होती. पण ते शब्द आज ऐकू आले नाही. विचित्र वाटलं म्हणून सहज वर पाहिलं.

'टू लेट्' चा बोर्ड तेथे लटकताना दिसला. नकळत पाय तिकडे वळले. मी भराभर पायऱ्या चढू लागलो आणि त्याच क्षणी डोक्यांत एक वीज चमकून गेली. एक अजब कल्पना आणि शरीरावर काटे उभे राहिले. इतक्या कर्कश थंडीतदेखील मी घामाघूम झालो. आंत गेलो, आणि...

...आणि दीडशे रुपयांवर तो फ्लॅट मी भाड्यानं घेतला....

.... आज त्या घटनेस वर्ष झालं. कुमारला त्याचे पापा मिळाले आणि कमलजानं "घोष वकील" हा बोर्ड काढून तेथे स्वतःच्या हातानं एस.के. बोसची पाटी लावली आहे.

आणि...

खरं सांगू, मी तरी कुठे आजीवन अविवाहित राहण्याचा संकल्प केला होता? आणि कुमारला पापा हवे होते ना, त्याचं काय?

# नाताळची भेट

''कर्नलची पत्नी'' (कर्नल्स वाइफ) या गाय-द-मोपासां यांच्या लघुकथेचा अनुवाद इतका उत्कृष्ट वठेल असं मला वाटलं नव्हतं. आजकाल मीच काय, माझ्या बरोबर निवृत्त झालेल्या बऱ्याच सैनिक अधिकाऱ्यांची लेखनाकडे ओढ लागलेली दिसत होती. आपण मनोहर माळगावकरप्रमाणे लिहितो असंच बहुतेकांना वाटायचं.

माझा अनुवाद स्नेहलतेच्या हाती पडू नये याची मी भरपूर काळजी घेतली होती. ते सर्व लिखाण मी माझ्या सेफमध्ये सुरक्षित ठेवलं होतं. वास्तविक हा अनुवाद करण्याची कल्पना मला स्नेहलतेमुळेच सुचली होती.

लता आता वयात आलेली होती. पत्नीच्या मृत्यूनंतर घरातली बरीच जबाबदारी तिच्यावर पडली होती. घरात कामाला बाई असली म्हणून काय झालं ? घरातल्या स्त्री वर्गाला काम पडतंच!

मला वाटतं, माझा अनुवाद किंवा मूळ गोष्ट लतेच्या हाती सापडली असावी आणि तिनं वाचली असावी. कारण या अनुमानाला पोषक अशा घटना घडत गेल्या. लतेच्या डोळ्यांत, हावभावात, बोलण्यात व एकूण वागण्यात पडत असलेला फरक जाणवायला लागला.

एकदा ती सहज म्हणाली,'अण्णा, तुमच्या मिशांत पांढऱ्या चांदण्या चमकताहेत. कलप का लावीत नाही?'

एकदा, 'अण्णा प्रेम आंधळं असतं ना?' असं तिनं विचारल्यानंतर, 'कशावरून आठवलं तुला हे?' या माझ्या प्रश्नाला उत्तर न देता तिने आपले टपोरे डोळे माझ्यावर रोखले अन् मुरका मारून तेथून सटकली.

वास्तविक वरील दोन्ही घटनांत विशेष असं काहीच नव्हतं पण म्हणतात ना, कावीळ झालेल्या माणसाला सगळं पिवळंच दिसतं!

'कर्नलची पत्नी' हा अनुवाद करण्याची कल्पना स्नेहलतेवरून आठवली हे जे वर विधान केलेलं आहे त्याचा मूळ इतिहास असा आहे. गाय-द-मोपासांचा एक कर्नल नायक आपल्या मित्राच्या अनाथ मुलीला आश्रय देतो. ती वयात आल्यावर तिच्याशी लग्न करतो. दोघांतील वयाचं अंतर पुढे दोघांनाही जाणवतं व पुढे एक

महाभारत निर्माण होतं. तिचं एका तरुण अधिकाऱ्यावर प्रेम बसतं. ते चोरटं प्रेम उघडकीस येतं आणि दोघांच्या वाटेतील धोंडा दूर करण्याच्या उद्देशानं कर्नल स्वत:ला गोळी घालून घेतो.

लतादेखील माझी आश्रित होती. माझे परम मित्र कानिटकर यांची ती मुलगी. कानिटकर कुटुंबाचा एका भयंकर अपघातात शेवट झाला. त्यांत लताच काय ती वाचली आणि नवरा-बायको आणि एक गोड मुलगा त्या अपघातात ठार झाल्यावर लतेला आम्ही उभयतांनी, मी आणि माझी पत्नी मनोरमा यांनी आमच्या घरी आणली.

तसं पाहिलं तर लतेचं आमच्यावर काहीच ओझं नव्हतं. वडिलांचा प्रॉव्हिडंट फंड, विमा, अल्पबचत आणि अपघात भरपाई या सर्वांचं व्याज आमच्या एकूण मिळकतीच्या दीड पट तरी असावं. पण आम्हांला मूल-बाळ नसल्यानं लतेचा खर्च आमच्या खर्चातच निघत असे.

'अण्णा, बरं आहे ना तुम्हांला? तुम्ही किनी आजकाल फार उदास-उदास दिसता, गडे!' लतेनं माझ्याशी असलं सलगीचं भाषण यापूर्वी कधी केल्याचं माझ्या स्मरणांत नव्हतं. माझ्या मनातली पाल चुकचुकली. अशात मी तिच्या डोळ्यालाडोळा लावण्याचं टाळत असे. लता वयात आलेली होती आणि मी अजून वयाच्या बाहेर पडलो नव्हतो. त्यात मी पुरुष होतो. सैनिक शिक्षणानं कसलेलं शरीर. तेथून बाहेर पडल्यावर आसनं, प्राणायाम, नियमित खाणं-पिणं आणि त्यात सुदृढ सांपत्तिक स्थिती व या दुर्लभ योगामुळे दृष्ट लागण्यासारखं व्यक्तिमत्त्व.

लता बरीचशी तिच्या आईसारखी दिसायची. तिच्या आईला मी तिच्या विवाहापूर्वी देखील बघितली होती. काळेभोर, टपोरे, भावनापूर्ण बंगाली डोळे, भुंग्यावर मात करणारे लांब-सडक कुंतल-बहुधा मोकळे अन् पाठीवर व्यवस्थिशीर सोडलेले आणि त्या लहानशा शरीरातून फुटून बाहेर पडू पाहणारं यौवन. आजकाल लता अगदी तश्शी, तश्शी, तिच्या या वयातील आईप्रमाणे दिसायला लागली होती.

अशात लतेच्या सहवासाची मला भीती वाटायला लागली होती. पण तिला मात्र माझ्या सहवासाची भीती वाटत नसावी असं मला वाटतं. कारण दिवसेंदिवस ती पुढेच सरकण्याचा प्रयत्न करीत होती आणि मी हळुहळू मागे सरकत होतो. युद्धाचं वातावरण दोन्हीं दलांत भडकलं होतं आणि दोन्हीं दलं आप-आपल्या पद्धतीनं पवित्रे घेत होती.

का हा माझा भास होता ? माझ्याच मनातील पाल ?

असं किती दिवस चालणार होतं कुणास ठाऊक. एकदा वाटायचं, याचा सोक्षमोक्ष करूनच टाकावा. त्याप्रमाणे पाऊल टाकण्याच्या प्रयत्नात असतानाच एक दिवस लता घाई-घाईनं माझ्या खोलीत आली आणि माझ्या गालाला काजळाचं बोट लावून जाणार इतक्यात मी तिचे दोन्ही होत माझ्या हातात धरले आणि विचारलं, 'हे काय लता?' ती बरीच कावरी-बाबरी झाली. मला वाटतं माझ्या डोळ्यांतील भावानं मला दगा दिला असावा.

'तुम्हांला माझी दृष्ट लागू नये म्हणून,' असं सहजपणे उच्चारून ती निसटली. तिनं मला आसनं करताना पाहिलं असेल का?

माझ्या 'प्लॅन्स' प्रमाणे त्या दिवाळीत माझा एक लांबचा भाचा टॅक्सी करून सहकुटुंब घरात प्रवेश करता झाला. त्याचा कबिला पाहून मी थक्कच झालो. एक सुंदर पत्नी आणि दोन चिमुकली बाळं. 'शेवटी या प्लॅनवर देखील पाणीच फिरलं तर !' या माझ्या भाच्याला मी पाच वर्षांपूर्वी भेटलेलो होतो. तो त्या वेळी मिल्ट्रीत 'सेकंड लेफ्टनंट' होता. हा पोरगा सडा असल्यास याला लता द्यावी आणि आपण ब्रह्मचर्याश्रम सेवावा या माझ्या विचारांचा फुगा ती फॅमिली पाहून पार फुटला.

असो. आमची दिवाळी फार छान गेली. पुन्हा येऊ असं आश्वासन देऊन ते कुटुंब टाऽऽ टाऽऽ करून निघून गेलं. आणि मी व लता त्या अनिश्चित वातावरणात पुन्हा वावरू लागलो.

एकदा वाटायचं, काय हरकत आहे?'' 'सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट'', ''ज्याच्या बाहुबलांत जोम त्यालाच जगण्याचा अधिकार.'' पण लगेच लता मित्राची आश्रित मुलगी आहे, मला वडिलांच्या ठिकाणीच मानते, या कल्पनेनं त्या भावनावश विकारावर पाणी फिरायचं. पण मन पुन्हा भांबावून जायचं, ''लतेची अनुमती दिसते ना तुला ? मग माघार का ? माझ्या उरलेल्या आयुष्याचा मी योग्य तो उपभोग का घेऊ नये ?'' या प्रश्नाला नेमकं उत्तर यायचं, ''लता खुळी आहे. तिचे विकार यौवन सुलभ आहेत. शेक्सपीयरच्या 'द टेम्पेस्ट' मधील मिरांडाप्रमाणे तिची स्थिती झाली आहे. तिला सावरणं माझं कर्तव्य आहे. ती माझी मुलगी नसली तरी मानलेली मुलगी आहे; किंवा पुतणी म्हणा कारण तिची आई मला भाऊजी म्हणायची.''

बारा एकर बागायतीतील ती बंगली, इतस्तत: वाढलेली रानटी फुलं, सेबच्या झाडांची दाटी, रान कोंबड्यांनी केलेली गर्दी, गावाच्या बाहेर, एकांतात असलेली ही वास्तू, निवृत्ती व ब्रह्मचर्य जीवनाला पोषक असणारं वातावरण, प्रेमी जीवांच्या रंगीत जीवनाला चेतवणाऱ्या लता- वेलीच्या ठिकठिकाणी असणाऱ्या वैचित्रपूर्ण जाळ्या, दक्षिण भागाला असलेली टेकडी;त्या टेकडीहून दिसणारा सूर्यास्त. फलद्रुप स्वप्नांचं ते एक प्रतीक होतं. ''एलिझियम'' अर्थात् स्वर्ग. किती सार्थक होतं त्याचं नांव ? पण आमचं स्वप्न फार दिवस टिकलं नाही. मनोरमा मला सोडून गेली. आणि लतेनं माझ्या जीवनात दोलायमान वातावरण निर्माण केलं.

नोव्हेंबर आला. त्या नोव्हेंबरमध्ये माझं ग्रहमान बदललं असावं. माझा भाचा प्रकाश व त्याचा मित्र डेव्हिड पाहुणे आले. प्रकाश चार-पाच दिवसांत निघून गेला. डेव्हिड मात्र राहिला.

'प्रकाशने ठीकच सांगितलं होतं तर?'

'काय?'

'तुमच्या या शिमल्याच्या वास्तूत रानफुलांच्या उग्र दर्पात चमेलीचा मधुर सुगंध अगदी मोहून टाकीत आहे.'

त्यानं चमेलीच्या सुगंधाचा उल्लेख लतेकडे पाहून केला की दाराशी उमलत असलेल्या दोन चमेलीच्या वेलांकडे पाहून केला हे मला त्या वेळी तरी कळलं नाही.

हळूहळू निसर्गाचा बहर ओसरू लागला. झाडांची पानं गळू लागली. वृक्षावर आतापर्यंत शोभा आणणारी सेब आता बाजारांतील दुकानांत शोभा आणू लागली. फुलं सुकली. शेवंती आणि चमेली मात्र थोडा बहुत दम धरून होती.

मी डेव्हिडजवळ लतेची गोष्ट काढली. त्याची, ''आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे,'' अशी परिस्थिती झाल्यास नवल नव्हतं.

या योजनेवरदेखील पाणी फिरलं. या वेळी लतेनं 'अण्णा, तुम्ही ही कल्पना अगदी मनातून काढून टाका.' असं निक्षून सांगितलं. एकूण तिचं माझ्यावरच प्रेम होतं तर! आणि ही आईप्रमाणे हट्टी मुलगी आपला हट्ट सोडायला तयार नव्हती तर! तिच्या आईनं पण कानिटकरांशी लग्न करण्याचा आपला हट्ट कुठल्याही विरोधाला न जुमानता पूर्ण केला होता.

मग हे दोघं नियमित शिकारीला का जातात? दक्षिणेकडील गोल टेकडीचं यांना इतकं का वेड लागलं आहे? हे इतका वेळ एकांतात का घालवतात? मला वेड लागायची वेळ आली आणि सोक्ष-मोक्ष करण्याच्या उद्देशानं पुन्हा एकदा लतेशी हुज्जत घालण्याचा निर्णय केला. 'पण अण्णा, ते ख्रिश्चन आहेत आणि मी एका कर्मठ हिन्दू वडिलांची मुलगी आहे. बाबांच्या आत्म्यावर हा फार मोठा आघात आहे.'

'तुझी आई पण ख्रिश्चन होती.'

'अण्णा ऽऽ'

'खरं सांगतो आहे हे मी.'

'पण मला कसं नाही कळलं हे ?'

'तू पोरवयात होतीस. आणि दुसरं असं की त्या उभयतांच्या उत्कट प्रेमात धर्म वितळून गेला होता - विलीन झाला होता. लते, आंतर्जातीय विवाहाचं एक उत्कृष्ट उदाहरण होतं ते जोडपं.'

लता माझ्याकडे बघत राहिली. अगदी तिच्या आईप्रमाणे. पुन्हा मोह पडतो का या भीतीनं मी चट्कन विचारलं, 'मग काय ठरलं?' एक मोहक हास्य करून लता तेथून सटकली.

२४ डिसेंबरची संध्याकाळ होती ती. नाताळचा सुंदर ताल जमला आमच्या घरी. उपस्थित पाहुण्यांसमक्ष डेव्हिडला लतेच्या रूपानं अमूल्य हिरकणी आणि माझ्या लग्नात सासरकडून मिळालेली बहुमूल्य हिऱ्याची आंगठी देण्यात आली. नाताळची अपूर्व भेट!

# संशयकल्लोळ

'उठताना ? बारा वाजताहेत बघा ?'

हो. मंजुळाच होती ती. माझ्या छातीत धडकीच भरली. जवळच अमऱ्या झोपला होता. आता उद्या सगळं गाव उपहासानं पाहणार माझ्याकडे. छे। छे। काय झालं भलतंच हे? चांडाळणीनं घात केला. अगदी सगळ्या तपश्चर्येवर पाणी फिरवलं. हो तपश्चर्याच नाहीतर काय ? मी माझ्या मनगटावरील घड्याळाला 'अलार्म' भरला होता. अन् उठणारच होतो. ही बया कशाला आली घातं करायला कुणास ठाउक.

'बाराला येतो मी' असं आश्वासन दिलं होतं ना तिला? मग?

एका क्षणात वरील विचार माझ्या मनांत येऊन गेले. अमऱ्याची झोप फार सावध होती. पण या क्षणाला तो घोरत होता.

'मी आलोच, तू हो पुढे' असं म्हणत मी मंजुळेला जवळ जवळ ढकललंच. तिनं बेछुटपणे अगदी मच्छरदाणीत तोंड खुपसून मला उठविण्याचा प्रयत्न केला होता.

पायाचा आवाज न करता मंजुळा दालनाच्या बाहेर पडली. रात्री बारा वाजता मंजुळेसारख्या सुंदर, तरण्याबांड पोरीनं मच्छरदाणीत तोंड घालून मला, बावीस तेवीस वर्षांच्या परपुरुषाला उठवावं याचा सारं गाव करायचा तोच विचार करणार हे मला पूर्णपणे कळून चुकलं होतं; पण काही का असेना! कबूल केल्याप्रमाणे आता उठायलाच हवं होतं अन् तिच्या घरी जावं लागणारच होतं. मी उठलो. चूळ भरली. अन् पायात चप्पल अडकवून तिच्या घरचा रस्ता धरला. अमऱ्या घोरतच पडला होता. हायसं वाटलं.

अमऱ्या म्हणजे एक वल्लीच होती. लग्नाची बायको नांदत नव्हती. स्वारी फॉरेस्ट बंगल्यावरच झोपत असे. आणि मला पण, एकट्या जीवाला त्याची सोबत नी करमणूक व्हायची. गावातल्या बित्तं बातम्या त्याला ठाऊक असायच्या. भलताच चोमडा होता तो. गावातल्या सगळ्या घरांत त्याला प्रवेश मिळायचा. अगदी बिनधोक. पण 'राजे बलवंत राव' - म्हणजे गावचे पाटील, एक फारच मोठं प्रस्थ-यांच्या द्वितीय पत्नीला आपण अजून पाहू शकलो नाही याची त्याला खंत वाटायची आणि

ही हार तो प्रांजळपणे कबूल करायचा. बळवंतरावांना दोन बायका होत्या. त्यांतील दुसरी भोर संस्थानातील होती. त्या अत्यंत रूपवती तरुणीला कुणीही पाहिलेलं नव्हतं. निदान पुरुषांनी तरी. आणि ज्या स्त्रियांनी पाहून तिचं वर्णन केलं होतं त्या, एक तर वर्णनशैलीच्या अभावामुळे व दुसरं म्हणजे स्त्रीच्या दुसऱ्या स्त्रीच्या सौंदयाची वर्णनं करण्यात फारच संकोची वृत्तीच्या अन् काटकसरी असतात. ''आहे आपली चार चौघीसारखी.'' ''लईच ग्वाड आहे पगा.'' अशीच किंवा या पेक्षा किंचित् अधिक गुणी वर्णन म्हणजे डोक्यावरून पाणी. पण मी अगदी शपथेवर सांगतो की गावाला ठाऊक होतं त्यापेक्षा 'मीनाक्षी', बळवंतराव यांची द्वितीय पत्नी अधिकच रुपवान होती. अत्यंत सुंदर. मी तिला बघितली होती. पण हे मी कुणालाच सांगितलं नव्हतं. बळवंतरावांना नाराज करण्यात किंवा त्या गावाची गटारं उपसण्यात मला काहीच हाशील नव्हतं. असल्या कामासाठी मी शहरातील माझं सुंदर घर सोडून त्या गलिच्छ गावात आलेलो नव्हतो.

मंजुळेच्या घरून परतलो त्या वेळी रात्रीचा एकचा सुमार असावा. अमऱ्या घोरतच होता. त्यामुळे मी अगदी निश्चिंत मनाने अंथरूणावर अंग टाकलं. पण लवकर झोप लागेना.

मला या खात्यात येऊन तीन वर्षं अन् या गावात बदली होऊन तीन महिनेच झाले होते. माझ्या खात्याचं नाव होतं ''जंगल खाते, मध्यप्रदेश''आणि मी दरोग्याच्या हुद्यावर काम करीत होतो. जंगलाच्या आसपास विखुरलेल्या खेड्यापाड्यांत आमच्या खात्यांतील चतुर्थ श्रेणीच्या अधिकाऱ्याची, राहणी, महत्त्व अन् दबाव ज्यांना बघायला मिळाला असेल त्याला दरोगासाहेबाच्या महत्त्वाची नव्यानं ओळख करून द्यायची आवश्यकता नाही. त्या दिवसांतील ती बेकारी, दारात आलेलं द्वितीय महायुद्ध या सर्वांमुळे महत्त्वाकांक्षा,पदव्या, घराणं इत्यादी जमेच्या बाबींवर तुळशीपत्र ठेवून मी या खात्यांत प्रवेश केला होता. इक्रामहुसेन, तिवारी आणि अजितसिंग यांची उदाहरणं माझ्या डोळ्यासमोर होती.

इक्रामहुसेन इंग्रजी पाचवी नापास होते. फॉरेस्ट गार्ड म्हणून पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी या खात्यात प्रवेश केला होता. पण मेहनत, हुषारी आणि आलेल्या संधीचा फायदा घेत ते आज जिल्हा जंगल अधिकाऱ्याचं पद भूषवीत होते.

तिवारी 'नॉन मॅट्रिकच' पण एस्डी.ओ. होते आणि अजितसिंग - ऑफिसर

ऑन स्पेशल ड्युटी. पंजाबी, उंचा पुरा, धिप्पाड. मॅट्रिक फॉरेस्ट गार्ड पासून दोन वर्षातच ओ.एस.डी.च्या पदावर गेलेला.

या तिघांचं त्रैराशिक मांडलं तर त्या हिशेबानं मी गेल्या वर्षीच कोईमतूरच्या Training College मध्ये जायला हवं होतं. पण ते हुकलं. आता यंदा मात्र ते न हुकू देण्याचा माझा निर्धार होता.

आपल्याकडे कुठल्याही बाबतींत अंगुली दर्शन होऊ नये याची मी खूपच दक्षता बाळगीत होतो. माझ्या पूर्वी येथे असणारे दरोगा साहेब खुशालचेंडू होते. लांचलुचपत, बाया बापड्या, खाणं पिणं इत्यादि बाबतीत या खात्यांतील कुठल्याही बहाद्दराला ते हार जाणारे नव्हते. काकणभर सरसच होते म्हणाना! आणि त्याचमुळे त्यांना एक पायरी खाली ओढण्यात येऊन त्यांच्या जागी माझी बदली झाली होती.

'जयवंत, जरा हुषारीनंच राहा. गाव आणि इलाखा व्रात्य आहे. कोईमतूर यंदा तरी हुकवू नकोस' असा इशारा तिवारी साहेबांनी दिलेला होता आणि त्याचाच परिणाम होऊन की काय, बिचाऱ्या जिबीशी मी फार कठोरतेने वागलो होतो.

मी गावात आल्याच्या तिसऱ्याच दिवशी जिबी माझेकडे आली आणि घरकामाबद्दल विचारपूस करू लागली. मानतुळे, माझ्या आधीचे दरोगा सोहब तिला पैशाअडक्याची मदत करायचे, ती पण त्यांची धुणी, भांडी इत्यादी कामं करायची व अडल्यावेळी कामी पडायची, इत्यादी माहिती मला अमऱ्याकडून कळलीच होती. ती एक तरुण विधवा होती. दिसायला चांगली होती.

पण मी तिला धुडकावून लावलं होतं आणि याबद्दल गावांत बरीच चर्चा झालेली होती. ती माझ्या जमेची बाजू होत चालली होती आणि लवकरच चांगली वयोवृद्ध माणसं पण ''या भाऊसाहेब'' म्हणून माझं आदरातिथ्य करू लागली होती.

आणि त्यानंतरच्या प्रकारानं तर माझ्या इभ्रतीत खूपच भर पडली होती. ''साहेब, सारा गाव हादरून सोडला की हो तुम्ही'' अशी शिफारस खुद्द अमऱ्यानं केली होती.

आमच्या गावांत चार-सहा वंजारी कुटुंब गावाच्या अगदी दुसऱ्या टोकाला वसती करून होते. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा होता. पण त्यांतील 'लख्या' दारू पाडायचा अन् बाकीचे थोडं बहुत सुतारकाम करायचे. लख्याची रवानगी लवकरच अकोला जेलमध्ये करण्यात आली होती. अन् बाकीचे वंजारी अनधिकृत लाकडं

तोडण्याच्या आरोपात भरपूर दंड भरून परत आले होते. पैशाची लालूच किंवा त्यांचा हुकुमी एक्का 'छम्मी' - सुंदर, तरुण आणि तारुण्यानं मुसमुसलेली 'छम्मी' - कसलाच डाव माझ्यावर चालला नाही. गाव अगदी खुश-बेहद खुश. आणि त्याला मुख्य कारण म्हणजे आजपावेतो झालेल्या लाडामुळे ती वंजारी जमात बरीच चढेल झाली होती. गावाचा खोकला औषधावाचून मिटला होता.

पण अमऱ्यानं घात केलाच. माझी तपश्चर्या फळाला येण्यापूर्वी भंग झाली. मी रात्री बारा वाजता मंजुळेकडे गेलो होतो. ती मला उठवायला आली होती. एका तासात परत आलो. इत्यादि बातमी आग लागल्यागत गावात पसरली. अन् भर टाकली आणखी एक दोघांनी. त्यांनी म्हणे आम्हाला पूर्वीपासूनच ताडलं होतं. मी जंगलातून विधी आटोपून परत येताना नेमकीच मंजुळेची गाठ पडायची. ती त्या वेळी शेतावर कामाला जायची. माझ्याशी एखादं मिनिट बोलायची अन् पान तोंडात कोंबून पुढे जायची इत्यादी वर्णनं ज्यांनी ज्यांनी हा प्रकार पाहिला होता त्यांनी पुरवली.

ही गोष्ट अगदी खरी होती. ती खरोखरच माझ्याशी रोज बोलायची. मी पण 'बरं बरं,' ठीक आहे. 'विचार करतो', 'पाहू या' इत्यादि वाक्यं बोलायचा . ही वाक्यंदेखील गावांत पसरली होती. बळवंतरावांनी याबद्दल माझ्याजवळ विचारपूस केली होती; पण उत्तर द्यायला माझ्याजवळ काहीच नव्हतं. माझ्या उत्तरांनी त्यांचं समाधान होण्यासारखं नव्हतं. त्यात तिचा नवरा भीमराव तिथं नव्हता. तो पोलीसच्या कचाट्यांत सापडला होता. आणि ज्या गोष्टीला मी भीत होतो तेच झालं अखेर. एके रात्री बारा-साडेबाराच्या सुमाराला मी मंजुळेच्या घरात असताना बाहेर काही कुजबुज ऐकू आली. पावलं वाजली. मी मंजुळेकडे पाहिलं. तिलाही परिस्थितीचा अंदाज आलेला दिसला. पण तिने तिकडे दुलर्क्ष केले.

दार उघडून मी बाहेर आलो तो पाचपन्नास माणसं लाठ्या-काठ्या घेऊन घराला गराडा घालून उभी असलेली दिसली. दारासमोरच भीमराव होता. त्याच्या हातात एक लांब दांड्याची कुऱ्हाड होती. दार उघडताच तो जरा बाजूला झाला अन् उगारलेली कुऱ्हाड खाली आणत, ''अस्सं होय'' म्हणत मागे सरला. जवळच बळवंतराव हात मागे ठेवून उभे होते. भीमरावनं बळवंतरावांना जवळजवळ ओढलंच आणि दारासमोर आणलं. दारांतून तो एकूण देखावा पाहून नंतर ते माझ्याकडे पाहू लागले. मी काही न बोलताच पुढे चालू लागलो पण प्रचंड जनसमुदायातून वाट काढणं कठीण वाटून

तिथंच थबकलो.

नंतर बळवंतराव पुढे आले. त्यांनी माझे दोन्ही खांदे गदागदा हलाविले आणि ‘‘माफ करा हं’’ म्हणत पुढे सरकले.

मंजुळेच्या घरांतील दृष्य पाहून लोक नुसते एकमेकांकडे पाहात तेथून सटकू लागले. मंजुळा पाठमोरी होती. उजवीकडे एक पाट मांडला होता. समोर देवाचा फुलांनी मढलेला फोटो होता व त्या जवळच व्यंकटेश स्तोत्राची पोथी पडली होती.

काही वेळानं मंजुळा बाहेर आली आणि तिनं खुलासा केला. मंजुळेच्या नवऱ्याला खुनाच्या आरोपावरून पकडण्यात आलं होतं. तो निर्दोष होता पण पोलिस कस्टडीत होता. तो सुखरूप परत यावा म्हणून कोण्या एका ब्राह्मणानं मध्यरात्री देवाची पूजा करून व्यंकटेश स्त्रोत्र ऐकावं असं सांगितलं होतं. गावातील एकुलता एक ब्राह्मण म्हणून निरक्षर मंजुळेनं त्या कामी माझं सहाय्य घेतलं होतं. आता भीमराव परत आला होता आणि माझं व्रत सफल झालं होतं.

# अनंत उर्फ अनंत

खट्कन आवाज झाल्यावर अनंतानं दाराकडे पाहिले तो दाराच्या फटीतून एक पाकीट आंत पडलेलं त्याला दिसलं. त्यानं ते पाकीट उचलून, न्याहाळून पाहिलं. हो! त्याचंच होतं ते पत्र. अपरिचित अक्षर वाटल्यानं त्याने ते पुन्हा-पुन्हा खाली-वर करून पाहिलं. ''ए. के. गोडबोले.'' खाली ब्लॉक नंबर व फ्लॅट नंबर पण त्याचाच होता. पण इतक्या लवकर आपणास कुणी पत्र पाठविले असेल? तो विचार करू लागला. विमलशिवाय त्याचा पत्ता त्यानं कुणालाच दिलेला नव्हता. शिवाय कालच तो कलकत्त्याला येऊन पोहोचतो न पोहोचतो तो आज हे पत्र आलेलं.

बराच वेळ तो पाकिटाकडे पाहतच बसला. अजून त्यानं ते पत्र उघडलं नव्हतं. अक्षर विमलचं, त्याच्या धाकट्या बहिणीचं, खास नव्हतं. बराच वेळ पाकिटाकडे पाहून त्यानं शेवटी ते पत्र उघडलं. वाचून अधिकच बुचकळ्यात पडला.

पत्र लहानसंच होतं. 'प्रिय अनंतराव, शेवटी तुम्हीच जिंकलात. मी हरले. त्या दिवशी नागपुरला तुम्ही म्हणाला होता न की पत्र लिहिण्याचा कंटाळा आहे बुवा आपल्याला. खरं बोलला होतात अगदी. दोन महिने झाले. एक चार ओळीचं पत्रही लिहू नये माणसानं म्हणजे काय म्हणावं ? शेवटी आईनं अगदी सिसेमिरा लावला माझ्यामागे पत्र लिहिण्याचा आणि म्हणून आज हे पत्र मी तुम्हाला लिहीत आहे. आता तरी उत्तर पाठवाल ना ? प्लीज. तुमची सुषमा.'

अनंताला कसलाच बोध होईना. पत्राच्या डाव्या बाजूला कु.सुषमाचा पत्ता होता - ...., शिमला. गम्मत वाटली अनंताला ते पत्र वाचून. शेवटी सहज उत्सुकतावश तो त्या ब्लॉक-सोसायटीच्या मॅनेजरकडे गेला. विचारपूस केली तर कळलं त्याच्या आधी त्या फ्लॅट मध्ये कोणी ए.के. बॅनर्जी होता. 'आणि त्याच्यां आधी?' अनंतानं विचारलं. मॅनेजरनं कुतूहल, शंका, प्रश्न, अशा विचित्र नजरेनं त्याच्याकडे पाहिले व रजिस्टर उघडलं. अनंतानं त्याचा संशय दूर करण्याच्या हेतूनं सांगितलं, 'काही पत्रं त्या व्यक्तीच्या नावाची आली आहेत.'

आई-वडिलांची छाया नाहीशी झाल्यापासून अर्धांगवायूनं पीडित असलेल्या आपल्या भावाच्या काळजीनं एरवी आनंदी व विनोदी असलेला अनंत् गेल्या दोन वर्षांपासून नीरस बनला होता. त्याला कशातच राम वाटेना. आपलं आयुष्य वाळवंटातून चाललं आहे असं त्याला नेहमी वाटायचं. भावाची जबाबदारी गळ्यात येऊन पडल्यामुळे तिशीच्या वर वय झालं तरी त्यानं लग्न केलेलं नव्हतं. मुंबईहून प्रमोशनवर कलकत्त्याला यावं लागल्यानं आपल्या भावाची व्यवस्था मावशीकडे करून तो कालच कलकत्त्याला येऊन पोहोचला होता. अन् आज हे पत्र. त्याला काहीच उमजेना.

शेवटी कसलीशी कल्पना त्याच्या डोक्यात घोळून गेली. त्यानं लेटर-रायटिंग पॅड काढलं अन् पत्र लिहिलं, 'प्रिय सुषमा, पत्र फारच त्रोटक आहे. खूप छान, खुलासेवार पत्र आल्याशिवाय समाधान होणार नाही. आपला, अनंत.'

उत्तराची वाट पाहात दिवसभर उदास असलेल्या सुषमाच्या हाती पत्र आल्यावर मोठ्या अभिमानानं तिनं आपल्या आईकडे आणि भावंडांकडे पाहिलं. पत्र ओच्यात घातलं अन् धावतच ती आपल्या खोलीकडे गेली.

'कुणाचं ग पत्र?' आईनं टोकलंच.

'अनंताचं,' एवढेच शब्द तिच्या आईला ऐकू आले.

'बरं झालं बाई आलं त्याचं पत्र,' तिची आई, वर्तमानपत्रांत तोंड खुपसून बसलेल्या पतिराजांकडे पाहून उद्गारली. 'पोरीनं कसा जीव खाल्ला होता त्याच्या पत्रासाठी.' वडिलांनी एकदा वर पाहून 'हं' म्हटलं अन् पुन्हा वर्तमानपत्रांत मान खुपसली पण त्यांचं लक्ष आता वर्तमानपत्र वाचण्यातून उडून गेलं होतं. हिवाळ्याच्या सुटीत नागपूरला गेली असता आपल्या मुलीनं पसंत केलेला हा जावई त्यांना फारसा आवडला नव्हता. लाईफ इंश्योरंस मध्ये कोणत्या तरी जागेवरील हा पोरगा त्यांच्या स्टेटसच्या मानानं कमी होता. पण पत्नीच्या आणि मुलीच्या हट्टापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. नाइलाजानं का होईना खिशात नोटा कोंबून त्यांना साखरपुड्यासाठी जावं लागलं होतं. बहिणीचं लग्न झाल्याशिवाय आपण लग्न करणार नाही हे त्या मुलाचं म्हणणं ऐकून डिसेंबरपर्यंत लग्नाची तारीख ढकलावी लागली होती. मुलगा

हेकेखोर व सुषमा पण हेकेखोर तेव्हा ही जोडी कशी नांदेल याची त्यांना काळजीच होती.

सुषमानं पत्र वाचलं. इश्श. अगदीच अरसिक आहे, बाई. इतका बी.एस्सी झालेला मुलगा अन् नुसत्या दोन ओळी लिहिल्या. काय म्हणे 'पत्र फारच त्रोटक आहे.' अन् खुलासेवार पत्र हवं त्याला. मी काय लिहिणार खुलासेवार? मी पडली मुलीची जात. त्यानंच नको का लांब-लचक पत्र लिहायला? तरी त्याची बहीण म्हणत होती फार विक्षिप्त स्वभाव आहे म्हणून.

पण सुषमानं खुलासेवार पत्र पाठवलं . त्यांत त्याच्या फोटोची मागणी केली. त्यानं पण "आधी तुझा फोटो यावयाला पाहिजे मग मी माझा पाठवीन" अशी सूचना केली. सुषमानं फोटो पाठविला. तो मिळाला मात्र. अन् अनंता खूष झाला. खरोखरच सुषमा फार सुरेख होती. तिचे ते लांब-सडक केस. वेणी तिनं फोटोत मुद्दाम खांद्यावरून पुढे आणली होती. अनंतानं तो फोटो आपल्या ड्रेसिंग टेबलावर फ्रेम करून ठेवला. त्याच्या फोटोबद्दल तगादे सुरू झाले. 'काढून पाठवितो.' 'तयार नाहीं.' 'अजून मिळाला नाही' इत्यादी बाबी सांगून त्यानं दोन महिने तर ढकलले.

अनंताशी पत्रव्यवहार सुरू झाल्यापासून सुषमा फार खुशीत होती. शेजारची बिंदु तर तिला खूपच चिडवायची. खरं म्हणजे ती आजकाल सुषमावर मनातून जळफळ करायची. बिंदु एम.ए. झालेली. सुषमा नुसती मॅट्रिक. तिचं लग्न जमावं अन् आपलं अजून कुठेच जमू नये या बद्दल तिचा विषादच नव्हे तर मत्सर वाटायचा.

पण दिवसामागून रात्र यावी त्याप्रमाणे आशेमागून निराशा, सुखामागून दुःख हे रहाटगाडगं कुणाला चुकलं आहे ?. अनंताच्या बहिणीचं पत्र आलं. 'ऑफिसच्या पैशाच्या गफलतीमुळे अनंता फरारी आहे. त्याचा पत्ता आम्हांला पण ठाऊक नाहीं. कुठून तरी पत्र आलं की सुषमाशी ठरलेलं लग्न मोडलं असं समजावं.'

केवढी रडली सुषमा त्या दिवशी! आधीच तर पंचवीसच्या वर वय झालं तरी लग्न जमत नव्हतं. अन् योगायोगानं ते जमवलं तर त्याचा असा शेवट व्हावा.

सुषमाचे वडील आपल्या पत्नीच्या सगळ्या गोष्टींच्या घाईबद्दल टोचत होते. दिवाळी दोन दिवसांवर आलेली; पण घरांतील वातावरण अत्यंत क्षुब्ध. कुणी कुणाशी

बोलत नव्हतं. बिंदूला कुणकुण लागली असावी. कारण सुषमाकडे आताशा येणं बंद केलेली ती खट्याळ मुलगी आता तास-तास येऊन बसू लागली. विचारू लागली होती. तिचा सहवास सुषमाला असह्य होऊ लागला होता. उद्या भाऊबीज. सुषमाचं मन रमविण्याचा प्रयत्न करण्यात तिचे दोघेही भाऊ आळी-पाळीनं ओवाळणी काय पाहिजे विचारत होते. बाहेर शिमल्याचे थंड वारे सुटल्यामुळे दाराला कडी घालून मंडळी आत बसली होती. भावांच्या प्रश्नांकडे सुषमाचे लक्ष नव्हते. इतक्यात कॉलबेल वाजली. दार उघडलं. हातात सूटकेस घेऊन एक अत्यंत देखणा, उंचा पुरा, ३०-३२ वर्षांचा पुरुष गॅलरीत उभा होता.

'कोण पाहिजे आपल्याला ?' -- सुषमाच्या आईनं मराठीतच प्रश्न केला.

'जोशी इथंच राहतात ना ? मी त्यांच्याकडे आलो आहे.'

'सिमला पाहायला आलो आहे. कलकत्त्याच्या बापटानं आपला पत्ता मला दिला.'' वगैरे खुलासा करीत पाहुणा आत आला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. फरारी अनंत गोडबोलेविषयी गोष्टी निघाल्या. आपणांस त्याची माहिती नसल्याचं पाहुण्यानं सांगितलं. पानं मांडून तयार होती. पाहुणा वॉश घेऊन आल्यावर आईंना म्हणाला, 'आईसाहेब, उद्या भाऊबीज ना ?'

'हो. का बरं?'

'हे पाहा, मी सुषमाकरता दिवाळीची ओवाळणी आणली आहे. पण मला उद्या सकाळच्या बसनं जायचं आहे तेव्हा म्हटलं आजच ओवाळून घ्यावं.'

सुषमा आईकडे अन् आई सुषमाकडे पाहातच राहिल्या. आज पाडवा. पाटावर टोपी घालून बसलेल्या त्या पाहुण्याला नाइलाजानं सुषमानं ओवाळलं. त्यानं ओवाळणी म्हणून घातलेल्या साडीकडे माय-लेकी, भाऊ-वडील पाहातच राहिले. भारी सिल्कची साडी होती. पंधरा-सोळाशेच्या खाली नसावी.

जेवणं झाली. मंडळी आपापल्या खोलीत झोपायला गेली. समोरच्या ड्रॉइंगरूम मध्ये पाहुण्याची बेड-कम-सोफा सेटवर झोपण्याची व्यवस्था केली होती. त्याच्यासाठी पाण्याचा तांब्या घेऊन सुषमा आली.

'सुषमा,' पाहुणा.

सुषमा दचकली. अत्यंत कोमल, मधुर स्वरातील त्या हाकेनं ती चपापली.

'ओळखलं नाहीस मला?'

सुषमा न्याहाळून पाहू लागली.

'मी अनंत गोडबोले.'

स्वत:च्या डोळ्यावर सुषमाचा विश्वास बसेना. त्यानं तिच्या पुढे कसल्याशा कागदांचा ढीग ओतला. सुषमानं स्वत:चं अक्षर ओळखलं. पण ती नुसती त्या पत्राकडे आणि अनंताकडे पाहातच राहिली. पत्रावरील पत्ता अनंत गोडबोलेचाच होता.

'सुषमा. माफ कर मला. ज्या खोलीच्या पत्त्यावर तुझी पत्रं आली तिथं पूर्वी अनंत गोडबोले नावाचा एक अकाउंटंट राहात होता. पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून त्याच्यावर पकड वॉरंट आले तेव्हा तो फरारी झाला. मी पण अनंत गोडबोले.'

पाडव्याला ओवाळून घेण्याचा अर्थ आता सुषमाच्या ध्यानात आला. तुळशीच्या लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी अनंत-सुषमाचा विवाह अगदी साध्या पद्धतीनं पार पडला.

Indian Institute of Advance Study
ACC NO. G-5049
Date 24/7/2003
SHIMLA

तिसरा दिवस. गुरुवार. तीच वेळ.

तीच लोकल. तोच डबा. तीच तरुणी.

तोच बाक. तोच मी. अन् तोच माझ्या समोरचा बाक.

त्याच रंगाची साडी. तेच हिरव्या चाफ्याचं फूल.

तिला त्याच रंगाच्या साडीचं एवढं आकर्षण

का होतं कुणास ठाऊक!

मला वाटतं ती कुठेतरी मॉडेल म्हणून काम करीत असावी.

क्षणभर मला त्या चित्रकाराचा हेवा वाटला...............

अशा उत्कंठा वाढविणाऱ्या एकापेक्षा एक सुरस कथा.

सूर्याक्षरविविधा

११९४, सदाशिव पेठ, पेरुगेट रस्ता, कॅनरा बँकेशेजारी

पुणे ४११ ०३०